नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4

* वर्ष ५१ * अंक २७४ * * अकोला * सोमवार, दिनांक ३१ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## स्वयंसेवक आले, पंतप्रधान गेले

आज सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आणि प्रचारक श्रीमान नरेंद्रजी मोदी रेशीम बागेतील स्वयंसेवकांची काशी असलेल्या संघ मुख्यालयात आले. असे म्हणतात की, संघाचे स्वयंसेवक म्हणून ते आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मोदीजींच्या स्वयंसेवकत्वाचा आवर्जून उल्लेख केला. स्वयंसेवक असले तरी ते देशाचे पंतप्रधान आहेत. त्या पदाचा प्रोटोकॉल असतो. त्यामुळे त्यांचा ताफा पंतप्रधानांचाच होता. हे सांगायला अजिबात हरकत नाही. यापूर्वी अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. तेव्हा त्या पदावर असताना त्यांनी कटाक्षाने संघ मुख्यालयाला भेट दिली नव्हती. आज पंतप्रधान म्हणून त्या पदावर असल्याचा उल्लेख नसला. तरी पंतप्रधान म्हणूनच मोदीजी आले होते. कारण ते पद संविधानिक आणि निर्विवाद आहे. त्यासोबतच त्याचे काही नियम आहेत. पंतप्रधान मोदीजी यांनी आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या पुतळ्याला वंदन केले. या भेटीत सरसंघचालक आणि पंतप्रधान यांच्यात बंद दाराआड चर्चा होईल. अशी अटकळ बांधण्यात आली होती. पण तसे काहीच झाले नाही. सध्या तरी दिल्लीची सत्ता कायम राहावी. याबाबतीत संघ आणि भाजप यांच्यात एक मत आहे. आजच्या संघ भेटीत चर्चा झाली नसली. तरी संघ हेच आमचे प्रेरणास्थान आहे आणि आम्ही कोणत्याही पदावर आरुढ असलो, तरी स्वयंसेवकच आहोत. हे पटवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न झाला. हे अजिबात नाकारता येणार नाही. लोकसभा निवडणुकीच्या ऐन मध्यावर मा. नड्डाजींचे एक विधान आले. ते म्हणजे भारतीय जनता पक्ष आता इतका मोठा झाला आहे की, त्याला संघाची गरज उरलेली नाही. हेच नड्डाजींचे विधान शंभर मेगाटनी ॲटमबॉम्ब सारखे निव्वळ भारतभर नव्हे तर जगभर वाजले. त्यानंतर लोकसभा निवडणुकांचे निकाल लागले आणि भारतीय जनता पक्षाच्या जागा ३०० च्या वर ६० येण्याच्या ऐवजी ३०० च्या खाली साठ जागा आल्या. मग इतर पक्षांच्या कुबड्या घेऊन सरकार बनवावे लागले. यामुळे भारतीय जनता पक्षाला संघाची गरज फारच जास्त आहे हे दिसून आले. नड्डाजींच्या त्या विधानाने जो स्फोट झाला. त्याचे परिमार्जन करण्याचा अनेकदा प्रयत्न झाला. पण संघाचे समाधान झाले की नाही, हे कोणालाही कळले नाही. औरंगजेबाच्या कबरीचा वाद एवढा महत्त्वाचा नाही, हे अखेर संघाने स्पष्ट केले. इतर अनेक बाबींवर देखील संघाने आपले मत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट शब्दात सुनावले होते. अशा वातावरणात केंद्राची सत्ता अबाधित राहण्यासाठी संघाची मदत अपरिहार्य आहे. हे पंतप्रधानपदी असलेल्या स्वयंसेवकांनी मान्य केले. अन्यथा गेल्या अकरा वर्षात नागपूरच्या अनेक चकरा मारूनही आत्ताच रेशीम बागेला येण्याची गरज का भासली. यापूर्वी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून २०१२ सालामध्ये सरसंघचालक सुदर्शनजींना श्रद्धांजली वाहण्यासाठी मोदीजी आले होते. त्यानंतर २०१३ च्या जुलै महिन्यात पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून आपले नाव निश्चित करावे. असा प्रयत्न तत्कालीन संघाचे मोठे अधिकारी सुरेशजी सोनी यांच्याद्वारे झाला होता. तेव्हाही मोदीजी आले होते. पंतप्रधानपदी नियुक्त झाल्यानंतर मोदीजींचा आजचा दौरा निश्चित संघाच्या स्वयंसेवकांना आणि अधिकाऱ्यांना सुखावणारा होता. ते जरी संघ स्थानी काही मिनिटे थांबले असले. तरी एकूण त्यांच्या दिसणाऱ्या विनम्रतेमुळे सरसंघचालक आणि इतर बडे संघाधिकारी हरखून गेले होते, यातही वाद नाही. आजची त्यांची नागपूर भेट केवळ संघ स्थानाला वंदन करण्यासाठी नव्हती. तर त्यांचे इतरही कार्यक्रम होते. असे सांगण्यात येत असले तरी त्यांची भेट मुख्यत्वे संघासाठीच होती. हे निःशंकपणे मान्य केलेच पाहिजे. पंतप्रधान अजूनही स्वयंसेवकच आहेत. हे या भेटीतून सिद्ध झाले हेही महत्त्वाचे आहे. आजच्या या भेटीचे राजकीय परिणाम भविष्यात कोणतेही झाले. तरी आपली सत्ता कायम राहावी. यासाठी संघाने ठाम भूमिका घ्यावी व आपल्या सरकारमागे ठामपणे उभे राहावे. हेच मोदीजींनी सुचित केलेले आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आरएसएस स्वयंसेवकासाठी सेवा हेच जीवन

## आपण देवापासून देश-रामापासून राष्ट्र या मंत्राने पुढे जातोय : पंतप्रधान नरेंद्र मोदी



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महाराष्ट्रातील नागपूर येथे माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरची पायाभरणी केली. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी पवित्र चैत्र शुक्ल प्रतिपदेचे महत्त्व अधोरेखित केले. देशभरात आज गुढी पाडवा, उगादी आणि नवरेह असे सण साजरे केले जात असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. याच दिवसाला जोडून येणाऱ्या भगवान झुलेलाल आणि गुरु अंगद देव यांच्या जयंतीचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. हा दिवस प्रेरणादायी डॉ. के. बी. हेडगेवार यांची जयंती तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) गौरवशाली प्रवासाच्या शताब्दी वर्षाची आठवण करून देणारा असल्याचेही त्यांनी सांगितले.

### सेवा हा स्वयंसेवकांसाठी जीवनमंत्र : मोहन भागवत

संघाचे प्रमुख मोहन भागवत म्हणाले की, स्वयंसेवक पुढे जात आहेत. स्वयंसेवकाला समाजाबद्दल प्रेम आहे. आपल्याला समाजातील प्रत्येकाला दृष्टी द्यायची आहे. जीवनात आवश्यक असलेली दृष्टी जीवनातील परिस्थितीचा इष्टतम वापर करून आपले जीवन अर्थपूर्ण, रोगमुक्त आणि निरोगी बनविण्यास मदत करते. शाखेत एक तास स्व-विकासासाठी आणि २३ तास समाज विकासासाठी. अनुकूल परिस्थिती मिळाल्यानंतरही, संसाधने मिळाल्यानंतरही, आपल्याला त्यांचा वापर करावा लागेल, समाजाचा फायदा होईल.



आजच्या महत्त्वपूर्ण दिवशी डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजींना आदरांजली वाहण्यासाठी स्मृती मंदिराला भेट देणे हा आपल्यासाठी सन्मान असल्याचे त्यांनी सांगितले.

याच दरम्यान भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षाच्या उत्सवाचे आणि पुढील महिन्यात राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दीक्षाभूमी येथे डॉ. आंबेडकरांना आदरांजली वाहण्याचे आणि त्यांचे आशीर्वाद घेण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. देशात सर्वत्र साजऱ्या होत असलेल्या नवरात्रोत्सव आणि इतर सर्व सणानिमित्त पंतप्रधानांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

पंतप्रधानांनी माधव नेत्रालयाच्या नवीन प्रांगणाच्या पायाभरणीचा उल्लेख करत हा विस्तार संस्थेच्या सेवा कार्यांना गती देईल, हजारो नवीन जीवनांना उजळून टाकेल आणि त्यांच्या जीवनातील अंधार दूर करेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी माधव नेत्रालयाशी संबंधित प्रत्येकाच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आरएसएस सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, स्वामी गोविंद देवगिरी महाराज, स्वामी अवधेशानंद गिरी महाराज, डॉ. अविनाश चंद्र अग्निहोत्री आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## ईदआधी मशिदीत स्फोट

■ महासागर प्रतिनिधी,
बीड, दि. ३०

बीडमधील अर्धामसला गावातील मशिदीत स्फोट झाला आहे. रविवारी पहाटे तीनच्या सुमारास हा स्फोट झाला. सुदैवाने या स्फोटामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मशिदीचे नुकसान झाले आहे. स्फोटामुळे मशिदीत सहा इंचाचा खड्डा पडला आहे. स्फोटानंतर तलवाडा पोलिस ठाण्याबाहेर मुस्लिम समाजाचे आंदोलन सुरू आहे. दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. हे दोन्ही तरुण २२ वर्षांचे आहेत.

## नक्षल्यांनी केली इसमाची हत्या



■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ३०

नक्षल्यांनी भामरागड तालुक्यातील धोडराज पोलिस ठाण्यांतर्गत जुव्वी गावातील एका प्रतिष्ठित इसमाची शनिवारी (ता.२९) रात्री गळा दाबून हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. पुसू गेब्बा पुंगाटी (६०) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. शनिवारी रात्री नक्षली जुव्वी येथील पुसू पुंगाटी यांच्या घरी गेले. त्यांनी पुसू यांना झोपेतून उठवून गावाबाहेर नेले आणि टॉवेलने गळा दाबून त्यांची हत्या केली. पुसू पुंगाटी हे गावातील प्रतिष्ठीत नागरिक होते. त्यांना पत्नी आणि दोन विवाहित मुले आहेत. मोठा मुलगा चिन्ना पुंगाटी हा एटापल्ली येथील राजे धर्मराव महाविद्यालयात प्राध्यापक, तर लहान मुलगा किशोर पुंगाटी हा अहेरी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात वकिली करतो.


प्रा.चिन्ना पुंगाटी यांची पत्नी पोलिस शिपाई आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जात पुसू पुंगाटी यांनी दोन्ही मुलांना उच्चशिक्षित केले. मात्र, नक्षल्यांनी त्यांची काल हत्या केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी घटनेला दुजोरा दिला आहे. घटनास्थळी कुठलेही पत्रक किंवा बॅनर आढळले नाही. त्यामुळे हत्या नक्षल्यांनी केली की अन्य कुणी, याबाबत तपास सुरु आहे.













## लाडकी बहीणमुळे तिजोरीवर ४३ हजार कोटींचा भार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३० :



संजय शिरसाटांचा खुलासा

राज्यातील शेतकऱ्यांनी पुढील दोन वर्षे तरी कर्जमाफी मिळणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टच सांगितले. सध्या राज्याची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे या वर्षी पण आणि पुढच्या वर्षी पण घेतलेल्या पीक कर्जाचे पैसे भरा, असे आवाहन अजित पवार यांनी शेतकऱ्यांना केले. आता यावर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी भाष्य केले आहे.

लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यानंतर राज्याच्या तिजोरीवर ४३ हजार कोटींचा भार आलेला आहे. वाढलेला भार पाहता शेतकरी कर्जमाफी होणार नाही, अशी माहिती असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीनंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार असल्याची चर्चा राज्यात सुरु आहे. मात्र, अद्याप राज्य सरकारच्या वतीने तशी कोणतीच घोषणा करण्यात आलेली नाही. अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात तरी शेतकऱ्यांना तसा दिलासा मिळेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र अर्थसंकल्पात देखील शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख करण्यात आला नाही.

लाडकी बहीण योजना आम्ही जेव्हा जाहीर केली त्यावेळी त्याचा असलेला आर्थिक भार जवळपास ४३ हजार कोटींचा आहे. त्यामुळे विकासाची कामं असली तरी त्याची गती मंदावली आहे. म्हणून पुढच्या काळात महसूल कसा वाढेल याकडे सरकारचं लक्ष आहे. महसूल वाढला तर या कामांना गती देता येईल. लाडकी बहीण योजना ही कायम चालू ठेवायला मदत देखील करता येईल, असे संजय शिरसाट म्हणाले.

# कुत्रा-मांजरीवरून जातीय तेढ निर्माण करायचे का?

### मनोज जरांगे यांचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर , दि. ३०: राज्यात आता कुत्रा आणि मांजरी वरून जातीय तेढ निर्माण करायचे आहे का? असा प्रश्न मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केला आहे. संभाजी महाराज एकाकी पडले असे, माध्यम म्हणत असतील तर ते कधीही एकाकी पडणार नाही. अशा शब्दात त्यांनी संभाजी महाराजांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिसांना देखील सहआरोपी करण्याची मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांची बीडमध्ये मेळाव्यादरम्यान अचानक प्रकृती खालावली होती. त्यानंतर त्यांना बीडमध्ये रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची प्रकृती आता स्थिर असून त्यांनी विविध विषयांवर प्रसार माध्यमांशी देखील संवाद साधला. यावेळी त्यांनी वाघ्या कुत्र्या वरून सुरू असलेल्या राज्यातील वादावर जास्त बोलण्यास नकार दिला. मी इतिहासकार नाही. त्यामुळे याविषयी इतिहासकार जास्त बोलतील, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्यांनी पोलिसांना सहआरोपी करण्याची मागणी केली आहे.

### वाघ्या कुत्र्याचा वाद काय?

छत्रपती शिवाजी महाराजांचा कुत्रा वाघ्या, त्याच्या ऐतिहासिक अस्तित्वाभोवती आणि रायगड किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळच असलेल्या त्याच्या स्मारकामुळे उपस्थित केला जात आहे. शिवाजी महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून वाघ्याचा पुतळा हटवण्याची मागणी केली आहे. या पत्रात कुत्र्याच्या अस्तित्वाला समर्थन देणारे ऐतिहासिक पुरावे नाहीत असे म्हटले आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने देखील वाघ्या बाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नसल्याची पुष्टी केली आहे. ज्यामुळे पुतळा हटवण्याच्या युक्तिवादाला बळकटी मिळते. या वादामुळे इतिहासकार, राजकारणी आणि सामान्य जनतेमध्ये वाद निर्माण झाला आहे, काहींनी असा युक्तिवाद केला आहे की वाघ्याचा पुतळा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी अनावश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे वाघ्याचा पुतळा यापूर्वी २०११ मध्ये संभाजी ब्रिगेडच्या सदस्यांनी काढून टाकला होता, परंतु नंतर तो पुन्हा बसवण्यात आला. स्थानिक धनगर समाजाने वाघ्या हा खरोखरच एक खरा कुत्रा होता असे मानून पुतळा हटवण्यास विरोध केला आहे.

# करुणा शर्माशी अधिकृत लग्न केले नाही धनंजय मुंडे यांचा कोर्टात युक्तिवाद

### करुणाच्या मुलांचे आई – वडील कोण? कोर्टाचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३०: वांद्रे सत्र न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना करुणा शर्मा यांना दरमहा २ लाख रुपयांची पोटगी देण्याचे आदेश दिलेत. मुंडे यांनी या आदेशांना माझगाव सत्र न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी शनिवारी झालेल्या सुनावणीत धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या वकिलांत जोरदार युक्तिवाद झाला. त्यात मुंडे यांच्या वकिलांनी आपल्या अशिलाचे करुणा शर्मा यांच्याशी अधिकृत लग्न झाले नसल्याचा दावा केला. त्यावर कोर्टाने त्यांना धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्यासी अधिकृत लग्न केले नाही, तर मुंडे व शर्मा यांच्या दोन मुलांचे आई -वडील कोण? असा उलटप्रश्न केला. त्यामुळे हे प्रकरण आता एका वेगळ्या वळणावर पोहोचले आहे. माझगाव कोर्टाने या प्रकरणी करुणा शर्मा यांच्या वकिलांना धनंजय मुंडे यांच्यासोबत झालेल्या लग्नाचे पुरावे सादर करण्याचे आदेश दिलेत. त्यानुसार त्यांनी हे पुरावे सादर करण्यासाठी आपल्याला वाढीव वेळ हवी असल्याचे कोर्टाला सांगितले. त्यानुसार, कोर्टाने त्यांना हे पुरावे पुढील तारखेपर्यंत सादर करण्याचे आदेश देत प्रकरणाची सुनावणी ५ एप्रिलपर्यंत स्थगित केली.

आजच्या सुनावणीत धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या वकिलांनी एकमेकांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. पण दोन्ही पक्षांनी वेळोवेळी उलटप्रश्न विचारून स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः कोर्टानेही दोन्ही पक्षकारांना वेगवेगळे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसण करण्याचा प्रयत्न केला. आजच्या युक्तिवादात मुंडे यांच्या वकिलांनी धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्याशी अधिकृतपणे लग्न केले नसल्याचा दावा केला. त्यावर न्यायाधीशांनी त्यांना मग धनंजय मुंडे व करुणा शर्मा यांच्या २ मुलांचे आई-वडील कोण? असा प्रश्न केला.

### मुलांना स्वीकारले, पण त्या माझ्या पत्नी नाहीत मुंडे

त्यावर मुंडे यांच्या वकिलांनी आपल्या अशिलाने त्यांचा स्वीकार केल्याचे नमूद केले. तसेच त्यांच्या आईशी लग्न केले नसल्याचे पुन्हा एकवार सांगितले. त्यानंतर पुन्हा कोर्टाने मुले तुमची आहेत म्हणता, मग करुणा शर्मा त्यांच्या आई नाहीत असे कसे म्हणता? असा सवाल केला. त्यावर मुंडेंचे वकील म्हणाले, धनंजय मुंडे यांनी दोन्ही मुलांना स्वीकारले आहे. त्यांना आपले नाव दिले आहे. त्यांनी करुणा शर्मा यांच्यासोबत काही काळ घालवला याचा अर्थ त्या धनंजय मुंडे यांच्या पत्नी होत नाहीत.

## मुख्यमंत्री अन सरकार बोळ्याने दूध पितात का?

### शिवरायांच्या अपमानावर उदयनराजे संतप्त

पुणे : छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या संदर्भात अनेकदा मी सांगून सुद्धा कोणतेही कायदे निर्माण झालेले नाहीत. कायदा तयार करायला बजेटची गरज नाही, असे म्हणत खासदार उदयनराजे भोसले यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे. उदयनराजे भोसले म्हणाले की, मुख्यमंत्री ऐकले पाहिजे म्हणण्यापेक्षा त्यांना कळाले पाहिजे ना, असे अवमान होत असेल तर सरकारच्या सगळ्यांना कळायला हवे. अवमान आणि दंगलीला कारणीभूत कोण? सत्ताधारी पक्षात असलो तरी किती वेळा सांगायचे एकदा सांगायचे बस, त्यानंतर त्यांना कळाले पाहिजे ना सर्वांना हे सगळे काय बोळ्यांने दुध पितात का सर्व जण असे म्हणत त्यांनी सरकारला घरचा आहेर दिला आहे. उदयनराजे भोसले म्हणाले की, शिवरायांनी सर्वधर्मसमभाव हा संदेश दिला.सर्वांना एकत्र केले, एवढेच नाहीतर लोकांचा राज्यकारभारात सहभाग असावा अशी कल्पना मांडत लोकशाहीचा ढाचा रचला.

# दिशा सालियन प्रकरणात नवा खुलासा

### प्रत्यक्षदर्शींचा जबाब समोर

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३०: दिशा सालियन प्रकरणी मालवणी पोलिसांनी सादर केलेल्या क्लोजर रिपोर्टद्वारे एक नवा खुलासा झाला आहे. त्यानुसार, दिशा सालियन इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडली तेव्हा तिला ३ जणांनी पाहिले होते. या तिन्ही प्रत्यक्षदर्शींनी त्यावेळी दिशाच्या अंगावर कपडे असल्याचा जबाब नोंदवला आहे. यामुळे दिशाचे वडील सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा यांनी दिशावर अत्याचार झाल्यासंबंधी केलेल्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, दिशा सालियन १४ व्या मजल्यावरून इमारतीच्या संरक्षण भिंतीच्या बाहेर असलेल्या फुटपाथजवळ पडली. तिच्या बिल्डींगबाहेर जवळपास २० फूट लांब पार्क केलेल्या एका गाडीच्या अगदी समोर ती पडली. त्यावेळी त्या गाडीमध्ये दोन-तीन तरुण बसले होते. काहीतरी पडल्याचा आवाज ऐकताच ते हादरले. त्यांनी



गाडीबाहेर येऊन पाहिले असता त्यांना दिशा जखमी अवस्थेत पडल्याचे दिसले.

### संरक्षक भिंतीबाहेरच्या फुटपाथवर पडली होती

मालवणी पोलिसांनी आपल्या रिपोर्टमध्ये या तरुणांचा व घटना घडली त्या इमारतीच्या वॉचमनचाही जबाब नोंदवला आहे. त्यानुसार, दिशा १४ व्या मजल्यावरून खाली पडली तेव्हा तिच्या अंगावर कपडे होते. ती खाली पडल्यानंतर इमारतीच्या वॉचमनसह इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबीयांनी आपल्या खिडकीतून घटना पाहिली. त्यानंतर ते ही खाली उतरले. त्यांनी दिशाला खासगी गाडीतून तातडीने रुग्णालयात नेले. तिला प्रथम एव्हरशाईन नर्सिंग होम व नंतर तुंगा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पण या दोन्ही रुग्णालयांनी तिच्यावर उपचार करण्यास नकार दिला. अखेर तिला शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिला मृत घोषित करण्यात आले. पोलिसांनी आपल्या तपासात एव्हरशाईन नर्सिंग होम, तुंगा हॉस्पिटल व शताब्दी रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचेही जबाब नोंदवलेत.

विशेष म्हणजे दिशा ज्या गाडीच्या समोर पडली होती, त्या गाडीतील तरुणांनीच या घटनेची माहिती पोलिसांना दिली होती, असेही मालवणी पोलिसांनी आपल्या क्लोजर रिपोर्टमध्ये म्हटले आहे. हा रिपोर्ट दाखल करण्यापूर्वी त्यांनी जवळपास १०० ते १५० जबाब नोंदवलेत. त्यानंतर जवळपास ८ महिन्यांनी आपला क्लोजर रिपोर्ट एसीपी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. हा रिपोर्ट मंजूर झाला आहे. पण या प्रकरणी एसआयटी स्थापन होऊन नव्याने तपास सुरू झाल्यामुळे तो प्रलंबित पडला आहे.

# संस्कृती संवर्धन समितीतर्फे स्वागतयात्रा

### संजय राऊत यांचा सवाल : पोलिस संरक्षण देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३०: महाराष्ट्रात एकप्रकारे गुजराज किंवा उत्तर प्रदेश पॅटर्न राबवला जात आहे. महाराष्ट्र थोडासा वेगळा आहे असे आम्हाला वाटले होते पण देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे त्याच मार्गाने चालले आहेत. अजित पवार यांचा मार्ग मला वेगळा दिसत आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवारांना हे सर्व माहिती असल्याने त्यांची भूमिका आणि भाषा वेगळी आहे. पण ते कैचीमध्ये अडकलेले दिसून येत आहे. कुणाल कामरा आणि माझे कालच बोलणं झाले. मी त्याला सांगितले की आपण कायद्याला सामोरे गेले पाहिजे. कुणाल कामरा हा अतिरेकी, देशद्राही कोण आहे तो? ता काय अल कायदाचा मेंबर आहे का? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे. संजय राऊत म्हणाले की, कुणाल कामरा हे देशातील एक



कलाकार, कवी, लेखक आहेत. शिंदेंचे कुणाबरोबर फोटो आहे ते आम्ही बाहेर काढू का? कुणाल हा फुटीरतावादी आहे का? त्याने मला विचारल्यावर मी सांगितलेल आपण कायद्याला समोर गेले पाहिजे. हा देश संविधानावर चालतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या लढाईत हे असे हल्ले आपल्याला सहन करावे लागतात. आम्हीही सुद्धा सहन केले आहे. कुणी जर कायदेशीर कारवाई केली असेल तर त्याला सामोरे गेले पाहिजे.

### मोदी-शहमहाराष्ट्राचे क्षत्रू

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या गटातील लोकांना कुणाल कामरा जर क्षत्रू वाटत असेल तर आम्ही त्याच्याशी बोलायचे नाही का? आम्हालाही वाटते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे महाराष्ट्राचे क्षत्रू आहेत, पण एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोकं त्यांच्या पायाशी जाऊन बसतात. आम्ही आमच्या भूमिका मांडत राहू. कंगना राणावतला मोदी सरकारने तेव्हा विशेष संरक्षण दिले होते. मात्र, आम्ही तिच्यावर हल्लावगैरे करणार नव्हतो. तसेच संरक्षण आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुणाल कामराला द्यावे, अशी मागणीही संजय राऊत यांनी केली.

### प्रताप सरनाईकांनी अभ्यास करावा

संजय राऊत म्हणाले की, कुणाल कामरा आणि सुषमा अंधारे यांच्यावर आणलेला हक्कभंग मान्य करण्यात असेल तात्यावर आमचे काही म्हणणे नाही. आमदारांचा हक्कभंग आणायचा अधिकार असून आमचे लोकं त्यांना उत्तर देतील. महाराष्ट्रात परिवहन खात्याचे अनेक प्रश्न आहेत, प्रताप सरनाईक यांनी त्याचा अभ्यास करावा, त्यावर त्यांनी बोलले पाहिजे. तुमच्यावर टीका केली म्हणून कुणी क्षत्रू राष्ट्राचे आहे होत नाही. तुम्हाला उत्तर देण्याचा अधिकार आहे ते तुम्ही देऊ शकतात, पण त्यांची एक पद्धत असते.

## हर्षवर्धन सपकाळांचा कर्जमाफीवरून अजित पवारांवर हल्लाबोल



मुंबई : शेतकऱ्यांच्या कर्जमाफीस आर्थिक स्थितीचे कारण देत नकार दिल्यानंतर हे बोलताना ना यांची जीभ थरथरते ना यांना लाज वाटते. जनतेने राक्षसी बहुमत देऊन यांना सत्तेवर बसवलेले लोक आता राक्षसाप्रमाणे बोलू लागलेत, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांन पुढे म्हटलंय की, नरेंद्र मोदी एक राजकीय व्यक्तिमत्व म्हणून २००२ या वर्षी गुजरातमध्ये झालेल्या जातीय दंगलीनंतर उदयाला आले. या दंगलीत मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याकांवर अत्याचार झाले. त्या पार्श्वभूमीवर मोदी यांची जगाला, देशाला ओळख झाली. भाजपकडून अल्पसंख्याकांना तिकीट देताना, मंत्रीपद देताना दुजाभाव केला जातो. त्यांची मुस्लीमविरोधी वक्तव्ये पाहिल्यानंतर सौगात-ए-मोदीम्हणजे सौ चुहे खा के बिल्ली हज को चलीअसा टोला त्यांनी लगावला आहे.

### सपकाळांचे ट्विट काय?

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, हे बोलताना ना यांची जीभ थरथरते ना यांना लाज शरम वाटते.जनतेने राक्षसी बहुमत देऊन सत्तेवर बसवलेले लोक आता राक्षसाप्रमाणे बोलू वागू लागले आहेत.

विधानसभा निवडणुकीत कर्जमाफी देऊ असे आश्वासन देऊन महायुतीने राज्यातील शेतकऱ्यांची मते घेतली आणि सत्तेवर येताच ३१ मार्च पूर्वी पीक कर्ज भरा, कर्जमाफी मिळणार नाही असे मुजोरपणे सांगत आहेत. लाडक्या बहिणींची फसवणूक अगोदरच केली आहे. २१०० चे आश्वासन देऊन त्यांच्या हातावर १५०० रुपये टेकवले जात आहेत. विविध कारणे देऊन १० लाखांहून अधिक महिलांना अपात्र करून योजनेचा लाभ बंद केला आहे आणि २१०० रुपये मिळण्यासाठी ५ वर्ष वाट पहावी लागेल असे उद्दामपणे सांगत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना यापूर्वी वीजमाफी, पीक कर्जाच्या व्याजात सवलत, दुधाचे अनुदान देण्यात आले आहे. लाडकी बहीण योजनेवर तर सुमारे ४५ हजार कोटींचा बोजा सरकारवर असल्याने कर्जमाफीसारखी सध्या तरी राज्याची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे आता शेतकऱ्यांसह कर्जदारांनी ३१ मार्चपूर्वी बँकांमध्ये कर्जाचे परतफेड करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिल्यानंतर हर्षवर्धन सपकाळांनी ट्विट केले आहे.

## कुणाल कामराविरुद्ध ३ नवीन गुन्हे दाखल

### मद्रास उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

मुंबई : मुंबईतील खार पोलिस स्टेशनमध्ये स्टँड-अफॉमेडियन कुणाल कामरा याच्याविरुद्ध तीन नवीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही प्रकरणे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत दिलेल्या वादग्रस्त विधानाशी संबंधित आहेत. शनिवारी मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिली तक्रार जळगावच्या महापौरांनी दाखल केली आहे, तर उर्वरित प्रकरणे नाशिकमधील एका हॉटेल व्यापारी आणि एका व्यावसायिकाने दाखल केली आहेत. मुंबई पोलिसांनी कामरा याला दोन समन्स बजावले आहेत. त्याला ३१ मार्च रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. महाराष्ट्र विधान परिषदेच्या अध्यक्षांनी २७मार्च रोजी त्याच्याविरुद्धची विशेषाधिकार भंगाची नोटीस स्वीकारली आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात आले आहे.

तथापि, शुक्रवारी त्याला मद्रास उच्च न्यायालयाकडून ७ एप्रिलपर्यंत अटकपूर्व जामीन मिळाला आहे. कुणालने याचिकेत म्हटले होते की, तो तामिळनाडूच्या विल्लुपुरम जिल्ह्यातील रहिवासी आहे. जर मी मुंबईत परत गेलो तर मुंबई पोलिस मला अटक करतील. त्याला शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून जीवे मारण्याचा धोका आहे. खरंतर, कुणाल कामराने एका स्टँड-अप कॉमेडी शोमध्ये एक विडंबन केले होते ज्यामध्ये शिंदे यांना देशद्रोही म्हटले होते. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे.

## पुरंदर विमानतळासाठी २८३२ हेक्टर जमिनीचे भूसंपादन

पुणे : पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रस्तावित जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन विमानतळाचे काम सुरु करावे, अशा सूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांनी केल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित पुरंदर विमानतळाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बारामती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी, पुरंदरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख,महापारेषण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पी. वेलरासू म्हणाले, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी२८३२ हे.आर. क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार शासनाने मान्यता दिली आहे. मोजणीसाठी लागणारे शुल्क . ४.८०कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. भूसंपादन प्रक्रियेत येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पूर्णपणे सहकार्य करण्यात येईल, असेही ते म्हणाले. भूसंपादन प्रक्रियेचे तात्काळ नियोजन करुन अचूक व पारदर्शकपणे प्रक्रिया पूर्ण करावी, नियोजित क्षेत्रासाठी प्रस्तावित केलेल्या गावांतील ७/१२ अद्ययावत असल्याची तसेच मोजणीमध्ये असलेल्या वस्तुस्थितीनुसार ७/१२ असल्याची, त्या गावांतील पीक पाहणी झाली असल्याची खात्री करा.

## महायुती'कडून राज्यातील स्त्रीशक्तीचा अपमान:डॉ.हुलगेश चलवादी

### 'लाडक्या बहिणींनी' विश्वासघातकी सरकारला धडा शिकवावा



पुणे : महागाईने होरपळलेल्या मध्यमवर्गीय तसेच गरीब कुटुंबातील भगिनींना लाडकी बहिण योजनेअंतर्गत मिळणारी रक्कम २१०० रूपये करण्याचे खोटे आश्वासन देवून सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने राज्यातील 'स्त्रीशक्ती'चा अपमान केला आहे, असा दावा बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.३०) केला. सरकारी तिजोरीत खडखडाट असल्याचा आणि लाभार्थी महिलांना मिळणारी मदत वाढवून देता येणार, याची माहिती महायुतीतील भाजप, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी पक्षाला (अजित पवार) होती. मागील दहा वर्षांपासून राज्य सरकारकडून घेण्यात आलेल्या कर्जाचा डोंगर आता ७लाख ८२ हजार ४४१ कोटींवर पोहोचला आहे. असे असतांनाही महायुतीने वाढीव २१०० रूपये देण्याचे खोटे आश्वासन देत भगिनींची दिशाभूल केल्याचा आरोप डॉ.चलवादी यांनी केला. अद्यापही ही रक्कम लाडक्या बहिणींना कधी मिळणार याची शाश्वती नाही. अशाप्रकारेच बहुजनांचा विश्वासघात प्रस्थापित राजकीय पक्ष आतापर्यंत करीत आले आहेत. शोषित, पीडित, उपेक्षित आणि वंचितांच्या भावनेशी खेळत राजकीय फायद्यासाठी त्यांचा आतापर्यंत वापर करण्यात आला आहे.त्यामुळे अशा राजकीय पक्षांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 'स्त्रीशक्ती'चा अवमान करणाऱ्यांना घरचा रस्ता दाखवा,असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले. महायुतीला त्यांच्या राजकीय पराभवाची 'ओवाळणी' लाडक्या बहिणी देतील, असा विश्वास डॉ.चलवादींनी व्यक्त केला.

## समाजसेवक डॉ. आमटे दाम्पत्याला मिळणार मानाचा पुरस्कार

पुणे : त्वचेच्या स्वयंप्रतिकार आजारांवरील इलाजासाठी मदत करणाऱ्या ऑटो-इम्यून ब्लिस्टरिंग डिसीज फाऊंडेशनच्या (एआयबीडीएफ) वतीने ज्येष्ठ समाजसेवक डॉ. मंदाकिनी व डॉ. प्रकाश आमटे यांना गोंदण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

तसेच आमटे दाम्पत्याच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती 'एआयबीडीएफ'चे संस्थापक अशोककुमार सुरतवाला यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. शरद मुतालिक, अनिरुद्ध बंबावाले, जयंत हेमाडे आदी उपस्थित होते.

# हडपसरमध्ये ड्रग्ज विक्रेत्यास अटक ५८ ग्रॅम मेफेड्रोनसह एक जण ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ३० : पुणे शहरातील हडपसर भागात मेफेड्रोन विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्याच्याकडून १३ लाख१७ हजार रुपयांचे ५८ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. मोहम्मद अख्तर शाह (वय_३३, रा. राजतारा कॉम्प्लेक्स, लक्ष्मी कॉलनी, हडपसर,पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अमली पदार्थ विरोधी पथक हडपसर भागात गस्त घालत होते. त्यावेळी अख्तर शाह याच्याकडे मेफेड्रोन असल्याची माहिती पोलीस




कर्मचारी सय्यद साहील शेख यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून १३ लाख १७ हजार ५०० रुपयांचे५८ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. त्याच्याविरुद्ध हडपसर पोलीस ठाण्यात ग्रुहा दाखल करण्यात आला. पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक नितीनकुमार नाईक, सय्यद साहिल शेख, संदीप शेळके, चेतन गायकवाड, संदीप जाधव यांनी ही कामगिरी केली.

## कुल्र्यात हिंदू नववर्ष स्वागतयात्रेत यंदा 'हिंदू दिनदर्शिके'चा देखावा !

मुंबई, दि. ३०: हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समिती कुर्ला (प.) यांच्या वतीने मागील१७ वर्षांपासून कुल्र्यात हिंदू नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे ज्यामध्ये दरवर्षी हजारो कुर्लेकर सहभागी होत असतात. यंदा समितीने प्रथमच 'हिंदू दिनदर्शिकेचे प्रकाशन केल्याने त्याविषयी अधिक जागृती करण्यासाठी याच विषयावर आधारित विविध चित्ररथ स्वागतयात्रेत सहभागी होणार आहेत. त्यासोबत सालाबादप्रमाने याहीवर्षी परंपरागत ढोल पथके, शिवकालीन शस्त्रकला प्रात्यक्षिके, लहान मुलांचे मनोरे व लेझीम, पंजाबी भांगडा नृत्य, दाक्षिणात्य चेंडा वाद्य पथक आणि हजारो नागरिक पारंपरिक वेशात स्वागतयात्रेत सहभागी होणार आहेत. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी १० वाजता श्री सर्वेश्वर मंदिर, शिक्षक नगर, गौरीशंकर मंदिर आणि जयभवानी चौक या चार ठिकाणाहून एकाच वेळी स्वागतयात्रांची सुरुवात होऊन दुपारी १२.००. वा भारत सिनेमा येथे चारही स्वागतयात्रा एकत्र येतील. यंदाचे वर्ष हे राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष असल्याने यानिमित्ताने भारतातील पहिले महिला गोविंदा पथक कुल्यार्तील गोरखनाथ मंडळ हे भारत सिनेमा येथे दुपारी १२.००. वाजता थर लावून मानवंदना देणार आहे. त्यानंतर कुर्ला रेल्वे स्थानकाजवळील जागृत विनायक मंदिरात महाआरतीने स्वागतयात्रेची सांगता होईल. अधिक माहितीसाठी ४५२४ ४०००७० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन समितीने केले आहे.

# शिवाजी महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका

### अजित पवार यांची विनंती

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३०: छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जाती आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी कधीही जात, धर्मात भेदभाव केलेला नाही. त्यांचा एकंदरीत इतिहास पाहिला तर वेगवेगळ्या समाजातील, समाजाचे, धर्माचे, पंथाच्या लोकांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी महाराजांना मनापासून साथ दिलेली आहे. मात्र, काहीजण वेगळ्या पद्धतीने इतिहास लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करतात. कृपा करून महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका, महाराज सर्वांचे होते, असा सल्ला अजित पवार यांनी दिला आहे. अजित पवार यांनी वढू बु. येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन



घेतले.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वढू बु. येथील महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. अजित पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्या एका समाजाचे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांना देखील पुढील काळामध्ये केवळ ९ वर्षे मिळाली. मात्र त्यांनी देखील अशाच पद्धतीने काम केले.

त्यांची औरंगजेबाने भीती मनात घेतलेली होती. शौर्य कसे असावे याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे संभाजी महाराज होते. त्यावेळी वेगळ्या मार्गाने आपल्यातील लोकांनी फितुरी केली आणि त्यातून जो इतिहास घडला तो सर्वांपुढे असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

फुले-शाहू-आंबेडकरांचीची विचारधारा जशी आहे, ज्यात सर्व जाती धर्मातील लोकांना बरोबर घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, सर्वांनी साथ द्यावी, त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. यातूनच कायदा व्यवस्था सुव्यवस्था महाराष्ट्र मध्ये चांगली राहण्यास मदत होईल, असे देखील अजित पवार म्हणाले. त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचेही ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वधर्मीय नव्हते. शिवरायांसह शंभूराजेंनी हिंदवी स्वराज्याचा विचार मांडला आहे, आपल्याकडील शिक्षक, प्राध्यापक, विचारवंत हे सर्व चुकीचा इतिहास मांडत आहेत, असे मत संभाजी भिडे यांनी व्यक्त केले होते. पक्ष, संघटना शिवरायांच्या नावाचा स्वार्थासाठी वापर करत आहेत. खरे तर छत्रपती शहाजीराजे हिंदवी स्वराज्य स्थापन व्हावे या मताचे होते. त्यात त्यांना यश आले नाही, पण त्यांचा विचार पुढे आणला तो शिवरायांनी, असे देखील ते म्हणाले होते.

महासागर
●सोमवार,दि.३१ मार्च २०२५
अकोला
पान 3



# हिंदू नववर्षाचे जल्लोषात स्वागत; सुत्रबद्ध नियोजन, यात्रा मार्गातील मंदिरांना ध्वज प्रदान









■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
शहरात संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नगराचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिर ते बिर्ला राम मंदिर याठिकाणी निघालेल्या हिंदू नववर्ष स्वाग यात्रेला अकोलेकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. संस्कृती संवर्धन समितीचे उत्तम नियोजन या यात्रेतून दिसले. पोलिस अधीक्षक बच्चन सिंग यांनी ग्रामदैवत राजराजेश्वर मंदिरात पुजा अर्चना करत रॅलीला शुभेच्छा दिल्या. तर रॅली समारोप होते त्या ठिकाणी अर्थात बिर्ला राम मंदिर येथे समारोप प्रसंगी जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी सपत्नीक प्रभू श्रीरामाची आरती करत सर्वांना हिंदू व मराठी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.अतिशय सुत्रबध्द नियोजन, यात्रा मार्गातील मंदिरांना ध्वजवितरण, ठिकठिकाणी रॅलीचे स्वागत, राऊतवाडी येथे संकल्प प्रतिष्ठानाच्या ढोल पथकाद्वारे रॅलीचे स्वागत या बरोबर मोठ्या संख्येत या नववर्षा स्वागत रॅलीत तरुणांचा सहभाग होता.

चैत्र शुक्ल १, प्रतिपदा शके १९४७ अर्थात गुढीपाडवा अर्थात हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याकरिता स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, स्वागत समिती अध्यक्ष अरविंद देठे यांच्या नेतृत्वात हे यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्कृती संवर्धन समितीची ही दुचाकी यात्रा राज राजेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर चौक, काळा मारुती, सिटी कोतवाली चौकातून मोठे राम मंदिर मार्गे जुना कपडा बाजार, मंदिर, गांधी चौक, तहसील ऑफिस, श्री जैन राणी सती मंदिर, श्री गुरुद्वारा प्रबंधक समिती न्यू राधाकिसान प्लॉट मार्गे अशोक वाटिका येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मदनलाल धिंग्रा चौकातून टॉवर चौक, रतनलाल प्लॉट चौक,नेकलेस रोड मार्गे सिव्हिल लाइन चौकातून जवाहर नगर चौक, १२ ज्योतिर्लिंग मंदिर तेथून राऊत वाडी मार्गे जठारपेठ चौकातून संकल्प ढोल पथकाच्या सोबत सातव चौक मार्गे बिर्ला लेआऊट मधील जलाराम मंदिर येथून मार्गक्रमण करत समारोप बिर्ला राम मंदिर येथे महाआरतीने या रॅलीचा समारोप झाला.

ठिकठिकाणी या रॅलीचे स्वागत करण्यात आले. या यात्रेतील मार्गात येणाऱ्या सर्व मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात आले. बिर्ला राममंदिर येथे लाठीकाठीचे प्रात्यक्षिक आणि गुलाब बाबा बँड पथकाचा समावेश होता. या स्वागत यात्रेत अकोल्यातील नागरिक पारंपरिक वेशभूषेत, फेटे घालून सहभागी झाले होते.

# कापशी तलाव येथे गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार कार्याचा शुभारंभ



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी लोक सहभागातून महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करणे करून मराठवाडा विदर्भ उत्तर महारोष्ट्रात सर्वसामान्य नागरिकांना शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. सरकार आणि लोक जनता ही एक नाण्याच्या बाजू असून जनतेसाठी शासन आपल्या दरबारी या योजनेअंतर्गत कापशी तलाव येथे गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार कार्याचा माध्यमातून शेती आणि नागरिकांना सुविधा उपलब्ध करून मतदार संघातील जनतेला अपेक्षित कार्य करण्यात आपण तत्पर असल्याचे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले कापशी इथे महाराष्ट्र शासनाच्या मुक्त धरण गाळ युक्त शिवार या योजनेअंतर्गत लोक जनतेच्या सहभागाने कार्यक्रमाचा शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार रणधीर भाऊ सावरकर उपविभागीय अधिकारी महसूल शरद जावळे सुरेश कवळे तहसीलदार,सचिन वानरे साहेब जलसंधारण भाजपा ओबीसी नेते,जयंतराव मसने,शंकरराव वाकोडे,अंबादास उमाळे, विठ्ठल चतरकार माधव मानकर,राजेश ठाकरे, सिद्धेश्वर लोणकर,वैभव माहोरे,अंकुश इंगळे किरण थोरात आदी प्रामुख्याने यावेळी उपस्थित होते यावेळी उपविभागीय अधिकारी डॉक्टर शरद जावळे व आमदार रणधीर सावरकर यांच्या कापशी रोड आणि कापशी या ग्रामपंचायत च्या वतीने स्वागत करण्यात आला.

# ईदनिमित्त रात्री उशिरापर्यंत बाजारात गर्दी

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
महिनाभर रोजे ठेवल्यानंतर मुस्लिम समाज बांधव रमजान ईद उत्साहाने साजरी करण्याची तयारी करीत आहेत.आज ३१ मार्च रोजी रमजान ईद साजरी करण्यात येईल. ईदनिमित्त खरेदीसाठी दिवसा तसेच रात्री उशिरापर्यंत बाजारात गर्दी दिसते.वर्षातील सर्वात मोठा सण साजरा होणार असल्याने तयारी देखील जोरदार सुरू असलेली दिसते. ईद साजरी करताना स्वतः सोबत इतरांना देखील सहभागी करून घेण्याचा प्रयत्न असतो. ईद निमित्त शिरखुमी तयार करण्यात येतो. त्यासाठी सुकाम वा, शेवया, विविध प्रकारच्या मिठाई, खजूर तसेच नवीन कपडे, पादत्राणे, अत्तर खरेदी करण्यावर भर दिला जातो. आपल्या ऐपतीप्रमाणे नवीन वस्तू खरेदी केल्या जातात. तसेच बाजारात फळे देखील मोठ्या प्रमाणात आली आहेत. त्यांची खरेदी देखील करण्यात येत आहे. अन्य समाज बांधव देखील मुस्लिमांना शुभेच्छा देऊन त्यांचा आनंद द्विगुणित करतात. ईदच्या नमाज साठी ईदगाहची स्वच्छता करण्यात आली आहे.

# गुढीपाडव्याच्या दिवशी गावात बालविवाह होणार नाही

## याची दक्षता सरपंच, पोलीस पाटील व ग्रामसेवक यांनी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
बालविवाहाच्या अनिष्ठ प्रथेला आळा घालणे आवश्यक आहे. जिल्हा बालविवाह मुक्त होण्याकरीता सर्व यंत्रणांनी सहकार्य करणे आवश्यक आहे.

सरपंच ,पोलीस पाटील, अंगणवाडी सेवीका व ग्रामसेवक शाळेचे मुख्याध्यापक व गावातील नागरिकांनी आपल्या गावात बालविवाह होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. दि.३० मार्च २०२५ रोजी गुढीपाडवा सण असून साडे तीन मुहूर्त पैकी हा एक मुहूर्त असतो या दिवशी अनेक धामीक विधी पार पाडल्या जातात या दिवशी देवस्थानांच्या ठिकाणी यात्रा उत्सव असतो त्याच प्रमाणे मोठ्या प्रमाणात विवाह सोहळयांचे सुध्दा आयोजन करण्यात येते याम ध्ये बालविवाह सुध्दा होवु शकतात तरी गावात या दिवशी विवाहअसल्यास सरपंच ,पोलीस पाटील, अंगणवाडी सेवीका व ग्रामसेवक यांनी मुला मुलींच्या वयाची शहानिशा करावी व गावात बालविवाह होणार नाही याची दक्षता घ्यावी.

बालविवाह प्रतिबंध अधिनीयमानुसार ग्रामसेवक हे ग्रामीण भागा करीता बालविवाह प्रतिबंध अधिकारी असुन अंगणवाडी सेवीका त्यांना सहायक आहेत.शहरी भागांसाठी बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी आहेत. गावांमध्ये बालकांच्या संरक्षणासाठी ग्राम बाल संरक्षण समित्या गठीत असुन ग्राम बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष हे सरपंच असून पोलीस पाटील हे त्या समितीचे सदस्य आहेत.त्या मुळे गावात बालविवाह तसेच बालकांच्या संबंधीत कोणतीही अघटीत घटना होणार नाही या बाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे. बालविवाह झाल्यास विवाह लावणारे भटजी, मौलवी , पादरी, भंतेजी तसेच मंडपवाले, वाजंत्री, विवाह सोहळयात सहभागी होणारी वऱ्हाडी मंडळी, मंगल कार्यालय मालक, वर वधुचे आईवडील यांना शिक्षा होवु शकते. तसेच गावचे सरपंच, पोलीस पाटील, ग्राम सेवक,यांच्या वरही कार्यवाही प्रस्तावीत केली जावु शकते त्या मुळे असे घडु नये याची दक्षता घेण्याचे आवाहन महिला व बालविकास विभागाद्वारे करण्यात आले आहे.

# जनता भाजी बाजारातील अतिक्रमण हटवले



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
जनता भाजी बाजाराला अतिक्रमणाने वेढा दिला आहे. भाजी विकत घेताना नसते दुखणे लावून घेण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. हातगाड्यांनी रस्ता व्यापल्यामुळे वाहतूक समस्या निर्माण झाली. या बेशिस्तपणाला शिस्त लावण्यासाठी महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. रविवारी सकाळ पासून अतिक्रमण हटवले. पोलिस बंदोबस्तात कारवाई करण्यात आली.जनता भाजी बाजार टॉवरकडून आणि न्यू कॉथ मार्केटच्या बाजूने अतिक्रमणाच्या कोंडीत सापडला आहे. पायी चालणे कठीण झालेले असताना दुचाकी चालक सरीस वाहने बाजारात आणतात. कसला देखील विचार केला जात नाही. बाजारात गजबज झाली आहे. नागरिक या विरोधात आवाज उठवतात परंतु शिस्त काही लागत नाही असा मामला झालेला आहे. बाजाराने मोकळा श्वास घेण्याची गरज आहे. त्या शिवाय समस्या सुटणार नाही. महापालिका आयुक्त सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनात शहरात अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. त्यानुसार जनता भाजी बाजारातील अंदाधुंद अतिक्रमणाला शिस्त लावण्यासाठी पाऊल उचलले. हा भाग अतिक्रमण मुक्त व्हावा याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

## थोडक्यात

### पातूर पंचायत समितीची वार्षिक आमसभा लवकरच

**पातूर :** तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या प्रभावी कार्यसंचालनासाठी आणि गावपातळीवरील प्रशासनाच्या नियोजनासाठी पातूर पंचायत समितीने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक आमसभेचे आयोजन केले आहे. ही आमसभा आणि सरपंच शिबिर लवकरच होणार आहे. या महत्त्वाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळापूरचे आ. नितीन देशमुख उपस्थित राहणार आहेत. सहाय्यक गटविकास अधिकारी अनंत लव्हाळे आणि प्रशासक सविता इंगळे हे सर्व सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत सदस्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

### पक्ष्यांसाठी जल पात्र ठेवा

**अकोला :** अकोल्याचे विक्रमी वाढते तापमान, प्रदूषित नाले, नद्या, वाढते कॉंक्रिटीकरणामुळे चिमण्यांसह अनेक पक्ष्यांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण होत आहे. मानवी वस्तीवर अवलंबून असलेल्या चिमण्यांना पूर्वी सार्वजनिक नळकोंडाळ्यांवर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटायचा. मात्र, आता बाटलीबंद पाणी मिळत असल्याने सार्वजनिक पाणपोयांची संख्या इतिहासजमा होत आहे. त्यामुळे पक्ष्यांना पाणी मिळणे दुरापास्त होत आहे. उन्हाळ्याच्या दिवसात तर पिण्यायोग्य पाणी न मिळाल्याने उन्हाळ्याच्या दरम्यान अनेक पक्ष्यांचा मृत्यू होतो करिता सर्वांनी आपल्याला अंगणात, गच्चीवर, जल पात्र ठेवा असे आवाहन पक्षी प्रेमी संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांची ५६ लाखांनी फसवणूक करणाऱ्याचा जामीन फेटाळला!

■अकोट,दि ३० (प्रतिनिधी): तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांची ५६ लाख रुपयांनी फसवणूक करणारा फरार आरोपी शेख ताजीम याचा अटकपूर्व जमानत अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी तेल्हारा पोलिस स्टेशनच्या फाइलवरील आरोपी शेख ताजीम शेख मोहम्मद (४२) रा. दहीगाव ता. तेल्हारा व दुसरा आरोपी शेख सलमान शेख अहमद रा. जळगाव जामोद यांनी संगनमताने तेल्हारा तालुक्यातील २२ शेतकऱ्यांकडून १९८४ क्विंटल ३० किलो शेतमाल घेऊन शेतमालाचे पैसे या शेतकऱ्यांना न देता त्यांची ५६ लाख ४१ हजार ७७५ रुपयांनीफसवणूक व विवासघात केला होता. या प्रकरणातील फरार आरोपी शेख ताजीम शेख मोहम्मद याने दाखल केलेला अटकपूर्व जमानत अर्ज नामंजूर केला आहे. त्यामुळे फरार आरोपीला तेल्हारा पोलिस अटक केव्हा करतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. १९ जून २०२४ रोजी गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरारच आहे. या प्रकरणात सरकारतर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करताना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तिवाद सादर केला.

# मकुंद नगरच्या संत गजानन महाराज मंदिरात श्रीरामनवमी उत्सव

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी)
स्थानिक मुकुंद नगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिर ट्रस्ट द्वारे श्रीराम नवमी वार्षिक उत्सव व संस्थेचा २९ वा वर्धापन दिन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.



रविवार दि. ३० मार्चपासून हा उत्सव प्रारंभ झाला.रविवार दि. ६ एप्रिल पर्यंत उत्सव चालणार आहे. ३० मार्च रोजी हभप रोठे गुरुजी यांचे सकाळी १० वाजता प्रवचन होणार आहे. तर रात्री ८ वाजता संतोष महाराज पिसे व त्यांच्याद्वारा विठ्ठल नाम जप केला जाणार आहे. सोमवार ३१ मार्च रोजी अतुल डोंगरे व त्यांच्या संचाद्वारा सांप्रदायिक भजन संध्या रात्री ८ वाजता होईल. मंगळवार १ एप्रिल रोजी रवींद्र कसबेकर यांच्या द्वारा रात्री ८ वाजता रामगाथा सादर केली जाणार आहे.

बुधवार २ एप्रिल रोजी देवेंद्र देशमुख स्वरांजली संगीत विद्यालय द्वारा भक्ती गीतांचा कार्यक्रम रात्री ८ वाजता होईल. गुरुवार ३ एप्रिल रोजी लक्ष्मी भजनी मंडळ द्वारा प्रमिला भिसे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून रात्री ८ वाजता भजन संध्या सादर केली जाणार आहे.

शुक्रवार ४ एप्रिल रोजी हभप भानुदास महाराज कराळे यांचीराष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन संध्या रात्री ८ वाजता होईल. शनिवार ५ एप्रिल रोजी हभप विनायक महाराज भोपळे यांचे रात्री ८ वाजता हरी किर्तन होईल. रविवार ६ एप्रिल रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज गई यांचे सकाळी १० वाजता रामजन्माचे कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता महाप्रसाद वितरित केला जाणार आहे.

सायंकाळी ५ वाजता मंदिरातून श्रींची मिरवणूक काढली जाणार आहे. संत गजानन महाराज मंदिर मुकुंद नगर येथे हे सर्व कार्यक्रम होणार असून भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन विश्वस्त श्री संत गजानन महाराज मंदिर ट्रस्ट द्वारा करण्यात आले आहे.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना पहिला लकी ड्रा ७ एप्रिलला

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी):
महावितरणच्या लकी६६६ डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ६६६६६६६ ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे. यापुढील लकी ड्रा मे व जून २०२५ या महिन्यात काढण्यात येणार आहेत. महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी- लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी. ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.


या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www.mahadiscom.in भेट द्यावी.

# कचरा गाडीतील गाणे मराठीत करा

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी)
शहरातील कचरा संकलित करणाऱ्या महापालिकेच्या कचरा गाड्यांमधून 'गाडीवाला आया घरसे कचरा निकाल' हे हिंदी गाणे गल्लीबोळात वाजते आहे. त्या हिंदी गाण्याऐवजी मराठी गाणे वाजविण्यात यावे, अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडी महानगरच्यावतीने महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्याकडे निवेदनातून करण्यात आली आहे. कचरा संकलित करण्यास येणाऱ्या गाडीवरील सुरू असणारे हिंदीतील गाणे 'गाडीवाला आया भैया कचरा निकाल' हे गल्लोगल्लीत वाजताना दिसते. हे गाणे हिंदीत असून महाराष्ट्रात हिंदी, गुजराती,वंचित बहुजन युवा आघाडीची मागणी आयुक्त बिहारी लोक राहतात की मराठी ? याचा जाब आयुक्त यांना विचारण्यात आला. त्यांनी या गाण्याची चौकशी करून या गाण्यावर किती खर्च करण्यात आला ? याचाही लेखाजोखा यावेळी आयुक्तांना निवेदनाद्वारे मागविण्यात आला. यावेळी आयुक्तांनी वंचित बहुजन युवा आघाडीला आश्वस्त करून तत्काळ माहिती घेऊन पुढील कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील, असे कळविण्यात आले. यावेळी बैठकीला शहराध्यक्ष वैभव खडसे, सोशल मीडियाप्रमुख सूरज दामोदर, साहिल बोदडे, तालुकाध्यक्ष मिलिंद दामोदर, आकाश जंजाळ, सचिन डोंगरे, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# ठाणे की रिक्षा... कोणी हलक्यात घेऊ नये!





महाराष्ट्रनामा

सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

स्टँड-अप कॉमेडीच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षांतील बड्या नेत्यांची खिल्ली उडवून त्यांचा अवमान करण्याची मोहीम कॉमेडियन कुणाल कामराने चालवली असावी. गाणी, शेरेबाजी, उपहासातून टवाळी असा स्टँड-अप कॉमेडीचा कामराचा कार्यक्रम नया भारत नावाने युट्यूबवर झळकला आणि नव्या वादाला तोंड फुटले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील गाणे व्हायरल होताच समर्थक शिवसैनिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटली. ज्या स्टुडिओमध्ये या गीताचे चित्रीकरण झाले, त्या हॅबिटॅट क्लबवर एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला करून तोडफोड केली. विनोद किंवा विडंबन हे निखळ असले पाहिजे, त्यातून हंशा पिकला पाहिजे, तो ऐकणाऱ्याला आनंद मिळाला पाहिजे. पण विडंबन गीताच्या नावाखाली कोणा मोठ्या नेत्याची बदनामी केली जाणार असेल किंवा कोणाला तरी खूश करण्यासाठी दुसऱ्या कोणाला गद्दार असे संबोधले जाणार असेल तर त्यावर संताप, निषेध आणि आक्रोश प्रकटणार याचेही भान कॉमेडियन कामराने ठेवायला हवे होते. हॅबिटॅट क्लबवर झालेल्या तोडफोडीचे कोणीही समर्थन केलेले नाही किंवा कोणालाही ते करता येणार नाही. कामरा गेली अनेक वर्षे विडंबन गीत सादर करतोय, पण कधी गद्दार असा शब्दप्रयोग वापरल्याचे आठवत नाही. हॅबिटॅट क्लबवरील हल्ला एकनाथ शिंदे यांच्याच शब्दांत ॲक्शनला ती रिॲक्शन होती...

*ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी*
*आँखो पे चश्मा, हाये...*
*एक झलक दिखलाये*
*कभी गुवाहटी में छुप जाए*

*मेरी नजर सें तुम देखो*
*तो गद्दार नजर वो आये...*
*मंत्री नही वो दलबदलू है,*
*और कहा क्या जाए...*

कुणाल कामराने आपल्या बिडंबन गीतात एकनाथ शिंदे यांचे थेट नाव घेतलेले नाही. पण ठाणे, रिक्षा, दाढी, चष्मा, गुवाहटी, बाप मेरा ये चाहे, हे शब्द वापरून त्याचा रोख एकनाथ शिंदे यांच्यावरच असल्याचे शाळेत जाणाऱ्या मुलांनाही चांगले समजते. सामाजिक घडामोडींवर किंवा राज्यकर्त्यांच्या वागण्या-बोलण्यावर रोज व्यंगचित्रे प्रसिद्ध होत असतात. विनोद, वात्रटिका, चारोळ्या वाचायला मिळतात. विडंबन किंवा उपहात्मक शेरेबाजी ऐकायला मिळते. पण देवदेवता, महापुरुष किंवा ज्याच्या पाठीशी हजारो-लक्षावधी अनुयायी आहेत अशा नेत्यांच्या विरोधात बोललेले त्याच्या समर्थकांना मुळीच आवडत नाही. म्हणूनच कामराने एकनाथ शिंदेंवर विडंबन गीत सादर करून आ बैल मुझे मार, अशी स्वत:ची अवस्था करून घेतली आहे. कामराने एकनाथ शिंदे यांचे विडंबन नव्हे तर त्यांचा अवमान आणि बदनामी करणारे गीत सादर करून स्वत:ला मोठी प्रसिद्धी मिळवली असेल. उबाठा सेनेची त्याने शाबासकी मिळवली असेल. त्याने एकनाथ शिंदे यांना गद्दार म्हणून उबाठा सेनेला आनंद मिळवून दिला असेल, पण शिंदेंच्या अनुयायांचा रूद्रावतार बघता, कामराने ठाणे की रिक्षा हे गीत गाऊन आपल्या स्वत:च्या पायावरच धोंडा पाडून घेतला आहे.

विडंबन कवी रामदास फुटाणे यांनी तर म्हटले आहे की, कामराने जे काही लिहिलं आहे, ते एकनाथ शिंदे या व्यक्तीविषयी अत्यंत द्वेषाने लिहिले आहे. हे गीत कोणाच्या प्रचारासाठी त्यांनी लिहिलेले असावे. व्यंगचित्रकाराने विसंगती शोधायची असते व त्यावर विनोद किंवा व्यंगात्मक कविता करता आली पाहिजे.

कुणाल कामरा आपली काही चूक झाली आहे, असे मानायला मुळीच तयार नाही. त्याची मस्ती कायम आहे. मद्रास उच्च न्यायालयातून त्याने काही दिवसांसाठी अटकपूर्व जामीनही मिळवला. तो म्हणतो - एखाद्या कॉमेडियनच्या शब्दासाठी कार्यक्रम स्थळावर हल्ला करणे म्हणजे, टोमॅटो घेऊन जाणारा ट्रक उलटवणे. कारण तुम्हाला दिलेले बटर चिकन पसंत नाही. मला जमावाची भीती वाटत नाही. मी पलंगाखाली लपून बसणार नाही. मी माफी मागणार नाही. प्रभावशाली सार्वजनिक नेत्यांवर विनोद सहन करण्यास तुम्ही असमर्थ आहात. म्हणून मी माझ्या अधिकाराचे स्वरूप बदलणार नाही.

एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात बराच संयम ठेवला असेच म्हणावे लागेल. त्यांचे समर्थक संतप्त झाले. त्यांनी तोडफोड केली. पण आपले समर्थक प्रक्षोभक व्हावेत, असे कोणतेही वक्तव्य त्यांच्याकडून झाले नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर हा व्यभिचार, स्वैराचार व एक प्रकारे सुपारी घेऊन बोलण्याचे काम आहे. हा माणूस मोदी, निर्मला सीतारामन, सरन्यायाधीश, मोठ्या उद्योगपतींवर असाच बोललाय. कामराने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर गायलेले बिडंबन गीतही व्हायरल झाले आहे.

*ताना शा ओ ताना शा,*
*झुठा हूँ, कातिल भी हूँ...*

कुणाल कामराचा स्टँड-अप कॉमेडीचा पहिला शो सन २०१३ मध्ये झाला. त्याने युट्यूब पॉडकास्ट सुरू केले. अरविंद केजरीवाल, रवीश कुमार, जावेद अख्तर, असदुद्दीन ओवेसी, मनीष सिसोदिया, प्रियंका चतुर्वेदी, कन्हैया कुमार, उमर खलिद अशी मांदियाळी त्याच्या कार्यक्रमात सहभागी झाली आहेत. हे सर्व नामवंत कोण आहेत हे लोकांना चांगले समजते.

सन २०२० मध्ये कुणाल कामरा व अर्णब गोस्वामी हे एकाच विमानातून प्रवास करीत होते. प्रवासात कुणालने अर्णबला काही प्रश्न विचारले. पण अर्णबने प्रतिसाद दिला नाही. अर्णब भित्रा पत्रकार असे संबोधत कामराने व्हीडिओ व्हायरल केला. त्यानंतर त्या विमान कंपनीने कामराला सहा महिने प्रवासाला बंदी घातली होती.

कामराच्या पराक्रमाचे संसदेतही पडसाद उमटले. शिवसेना खासदार धैर्यशील माने यांनी कामराने माफी मागावी अशी मागणी केली. त्याचा एकही शो राज्यात होऊ देणार नाही, असे बजावले. त्याच्या डोक्याचा एक भाग रिकामा आहे, अशीही टीका केली. खासदार नरेश म्हस्के यांनी म्हटले की, आमच्या नेत्याची कोणी बदनामी करीत असेल तर आम्ही शांत कसे बसू?

खरे तर कामराने त्याच्या विडंबन गीतातून नवीन काहीच सांगितले नाही. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंड केल्यापासून उबाठा सेना व पक्षप्रमुख हे शिंदेंचा उल्लेख मिंधे व गद्दार असा सातत्याने करीतच आहे. एवढे करूनही लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भरीव यश मिळवले. विधानसभेत शिंदे यांचे ५७ आमदार निवडून आले, तर उबाठा सेनेचे २० आमदार विजयी झाले. खरी शिवसेना कोणती व शिवसेनेचा प्रमुख कोण याचे उत्तर मतदारांनी निवडणुकीत दिले. मग कामरा हा, शिंदे यांचे नाव न घेता त्यांचा गद्दार असा उल्लेख का करीत आहे?

ठाकरे सरकार सत्तेवर असताना तत्कालीन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना अटक करण्यासाठी पुणे, नाशिकवरून पोलिसांचा मोठा फौजफाटा कोकणात पाठवला होता. देशाचा कितवा स्वातंत्र्य दिन हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना अचूक सांगता आले नाही, म्हणून राणे यांनी त्यांना जाहीरपणे फैलावर घेतले होते. त्याचा राग म्हणून नारायण राणेंना भरल्या ताटावरून उठवून अटक करण्याचे आदेश पोलिसांना कोणी दिले होते? तेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि केंद्रीय मंत्र्यांचे विशेषाधिकार व राजशिष्टाचार महाआघाडी सरकारला आठवले नाहीत. ज्या नेत्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना कोकणात घराघरांत पोहोचवली, रुजवली आणि वाढवली त्या नेत्याचा अवमान करताना त्याने केलेल्या कार्याचा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा ठाकरे सरकारला विसर पडला होता का? नंतर न्यायालयाने नारायण राणे यांची निर्दोष मुक्तता करून ठाकरे सरकारला चपराक दिली.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही कामराच्या बिडंबन गीतावर सभागृहात पडसाद उमटले, तेव्हा स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एकनाथ शिंदे यांच्या समर्थनार्थ ठामपणे पुढे सरसावले, हे सर्व टीव्हीवरील थेट प्रक्षेपणातून महाराष्ट्राने बघितले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्या व्यंगचित्रातून, लेखणीतून व वाणीतून अनेकांना फटकारले, आचार्य अत्रे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आपल्या लेखणीतून व वाणीतून पंडित नेहरू, मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, स. का. पाटील यांच्यावर जोरदार हल्ले चढवले. अनेक मराठी कवींनी विडंबनातून राज्यकर्त्यांवर बोचरी टीकाही केली. पण त्यात कोणाची वैयक्तिक बदनामी नव्हती.

महाआघाडीचे सरकार सत्तेवर असताना कंगना रणावतच्या घरावर बुलढोझरची कारवाई केली होती. तेव्हा एका लोकप्रिय अभिनेत्रीच्या प्रतिष्ठेचा विचार केला नव्हता का? त्यामागे केवळ सुडाची भावना होती का? अभिनेत्री केतकी चितळेने एक पोस्ट फॉरवर्ड केली तेव्हा महाविकास आघाडीच्या शिल्पकारांचा अवमान झाला म्हणून तिला दीड महिना जेलमध्ये एकाकी डांबले होते. विशेष म्हणजे, अटक वॉरंट नसताना तिच्यावर कारवाई केली. पोलिसांच्या वर्तनाविषयी तिची तक्रारही नोंदवून घेतली नव्हती. मुंबईतल्या रस्त्यांवरील खड्ड्यांवर रेडिओ जॉकी मलिष्काने मुंबई, तुला बीएमसीवर भरंवसा नाय काय, हे विडंबनात्मक गाणे सादर केले तेव्हा त्याला अफाट प्रतिसाद मिळाला. तेव्हा मंत्रालयात व महापालिकेवर ठाकरेंच्या पक्षाची सत्ता होती.


मलिष्काच्या घरी महापालिकेच्या पथकाने धाड टाकली व तेथे झाडाच्या कुंडीत डेंग्यूच्या अळ्या सापडल्याचा शोध लावला व कारवाई का करू नये म्हणून मलिष्काला नोटीस बजावली. मुंबईत मातोश्रीबाहेर हनुमान चालिसा म्हणणार, असे जाहीर केले म्हणून तत्कालीन खासदार नवनीत राणा व त्यांचे पती आमदार रवी राणा या दोघांनाही महाआघाडी सरकारने १४ दिवस जेलमध्ये डांबले होते. कामराच्या गाण्याने खूश झालेले पक्षप्रमुख व त्यांच्या संवगड्यांना महाआघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्य माहिती नव्हते का? ठाणे की रिक्षा, जनतेने मंत्रालयात पाठवली आहे, तिला कोणी हलक्यात घेऊ नये...

# सण-उत्सवांवर पाश्चात्यांचा प्रभाव !

काळ जसा पुढे सरकत आहे तसे विज्ञानाच्या प्रगतीमुळे जग अधिकाधिक जवळ येत चालले आहे. आजमितीला प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे आणि त्यामध्ये मुबलक इंटरनेट डाटा उपलब्ध आहे. जगातील चालू घडामोडी एक क्लिकवर आपल्याला पाहता येत आहेत. इंटरनेटने जग जवळ आले; मात्र आपण आपल्या संस्कृतीपासून आणि येथील परंपरांपासून हळूहळू दूर जाऊ लागलो. आपल्या मातीतील चांगल्या परंपरांना त्यागून पाश्चात्यांच्या अनिष्ट प्रथांना जवळ करू लागलो. आपली संस्कृती, आपली वेशभूषा यांचे दर्शन आज केवळ सण-उत्सवांपुरते मर्यादित राहिले आहे. नुकताच गुढीपाडवा सरला. त्यानिमित्ताने अनेक ठिकाणी हिंदू नववर्ष स्वागतयात्रा काढण्यात आल्या. यांमध्ये नागरिक पारंपरिक वेशभूषेत मोठ्या प्रमाणात सहभागी झालेले पाहायला मिळाले. हे पाहिल्यावर 'आपल्या संस्कृतीचे जतन आपण वर्षभर का करू शकत नाही' हा प्रश्न स्वाभाविकपणे पडला. दरवर्षी ३१ डिसेंबरला ख्रिस्ती नववर्षाच्या स्वागतासाठी जसे फटाके वाजवले जातात तसे शनिवारी मध्यरात्री १२ वाजता मुंबईत सर्वत्र मोठ्या प्रमाणात फटाके फोडले गेले. पाश्च्यात्यांची नववर्ष स्वागताची प्रथा आता हिंदू नववर्ष साजरा करताना पडू लागली आहे हे खरे तर दुर्दैवच म्हणावे लागेल. हिंदू धर्मशास्त्रानुसार दिवसाची सुरुवात ही मध्यरात्री १२ वाजता होत नसून पहाटेच्या सूर्योदयाने होते. त्यामुळे शुभदिनाच्या शुभेच्छा सूर्योदयानंतरच दिल्या जाव्यात. दुसरी खटकणारी बाब म्हणजे सामाजिक माध्यमांतून शुभेच्छा देताना अनेकांनी 'हॅप्पी गुढीपाडवा' आणि 'हॅप्पी न्यू इअर' अशा प्रकारचे संदेश दिले यामध्ये अनेक सेलिब्रिटीही होते. होळी, गणपती, दसरा, दिवाळी या हिंदू सणांच्या बाबतीतही दरवर्षी तेच घडते. इंग्रज भारतातून निघून जाऊन आज ७७ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही इंग्रजीचे भूत आपल्या डोक्यावरून गेलेले नाही. आजमितीला अनेक पालकांनी आपल्या पाल्यांना इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांतून शिक्षण दिल्याने त्याचे परिणाम शुभेच्छा देतानाही दिसू लागले आहेत. हिंदू सणांच्या आणि उत्सवांच्या शुभेच्छा आपल्या मातृभाषेत देण्यात जो गोडवा आहे तो परकीय भाषेत कसा येणार ? आज या गोष्टीला आपण विरोध केला नाही, तर येणाऱ्या पुढच्या पिढीला आपल्या महान भारतीय हिंदू संस्कृतीचे आणि स्वभाषेचे महत्व कोणत्या तोंडाने सांगणार आहोत ?


जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी



हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या. मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली. या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली. कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुमारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते. एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट. मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत. १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होत्या. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पत्थर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रँडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रँडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रँडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण-रमजान!



ईद हा आनंदाचा सण आहे जरी हा प्रामुख्याने इस्लामचा सण असला तरी, आज जवळजवळ सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. खरं तर या सणापूर्वी सुरू होणाऱ्या पवित्र रमजान महिन्यात, इस्लाम धर्माचे लोक संपूर्ण महिनाभर उपवास ठेवतात. मुस्लिमांनी या महिन्यात उपवास ठेवणे अनिवार्य आहे कारण त्यांचा असा विश्वास आहे की यामुळे अल्लाह प्रसन्न होतो. हा सण एखाद्याच्या धर्माप्रती त्याग आणि समर्पणाचे प्रतिबिंबित करतो. हे दाखवते की मानवाने आपल्या मानवतेसाठी आपल्या इच्छांचा त्याग केला पाहिजे जेणेकरून एक चांगला समाज निर्माण करता येईल. ईद-उल-फित्र एक दिवस आधी चंद्र पाहून निश्चित केला जातो. सौदी अरेबियामध्ये एक दिवस आधी आणि भारतात एक दिवस नंतर चंद्र दिसत असल्याने ईद दोन दिवस साजरी केली जाते. ईद हा एक महत्त्वाचा सण आहे म्हणून या दिवशी सुट्टी असते. ईदच्या दिवशी सकाळपासून त्याची तयारी सुरू होते.

रमजानचा चंद्र मावळल्यानंतर आणि ईदचा चंद्र दिसल्यानंतर पहिल्या दिवशी मुस्लिम धर्मियांचा ईद हा सण साजरा केला जातो, ही इस्लाममधील दोन ईदांपैकी एक आहे. इसवी सन ६२४ मध्ये बद्रच्या लढाईनंतर पैगंबर मुहम्मद यांनी पहिली ईद उल-फित्र साजरी केली. ईद उल फित्रच्या निमित्ताने अल्लाहचे श्रद्धावान संपूर्ण महिना अल्लाहची पूजा करतात, उपवास ठेवतात आणि कुराण पठण करून त्यांचे आत्मे शुद्ध करतात, ज्याचे बक्षीस किंवा वेतन मिळण्याचा दिवस ईदचा दिवस म्हणून ओळखला जातो, जो जगभरातील मुस्लिम मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतात. ईद उल-फित्रचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे गरिबांना फित्र देणे बंधनकारक आहे, जेणेकरून जे लोक गरीब आहेत आणि त्यांची ईद साजरी करण्यास भाग पाडले आहेत, ते नवीन कपडे घालू शकतील आणि समाजात एकमेकांसोबत आनंद वाटू शकतील. ज्यांच्याकडे ५२.५० तोळा चांदी किंवा ७.५० तोळा सोने आहे त्यांच्यावर फित्र अनिवार्य आहे. त्यांनी स्वतःसाठी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलांसाठी सदका-ए-फित्र द्यावे, जे ईद-उल-फित्रच्या नमाजपूर्वी करावे लागेल. ईद हा बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण आहे, ईदच्या दिवशी लोक एकमेकांच्या हृदयातील प्रेम वाढवण्यासाठी आणि द्वेष दूर करण्यासाठी एकमेकांना मिठी मारतात.

रमजान हा इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, ज्यात कुराण इस्लामी संदेष्टा मुहम्मद यांना अवतरले आहे. जगभरातील मुस्लिम प्रार्थना, प्रतिबिंब आणि समुदाय, उपवासाचा महिना (सॉम) म्हणून पाळतात. मुहम्मद (सल्ल)च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून रमजान महिन्यातील उपवास हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक आहे आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे हे सर्व प्रौढ मुस्लिमांसाठी अनिवार्य आहे, त्यामुळे ते या महिन्यात मुस्लिम लोक पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत दिवसाच्या प्रकाशात उपवास करून घालवतात. जे तीव्र किंवा दीर्घकाळ आजारी नसलेले, प्रवास करणारे वृध्द, स्तनपान करणारे मधुमेह किंवा मासिक पाळीत आहेत. पहाटेच्या जेवणाला सुहूर असे संबोधले जाते आणि रात्रीच्या जेवणाला इफ्तार म्हणतात. मध्यरात्री सूर्य किंवा ध्रुवीय रात्र असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या मुस्लिमांनी मक्काचे वेळापत्रक पाळावे, असे फतवे जारी केले गेले असले तरी सर्वात जवळच्या देशाचे वेळापत्रक पाळण्याची प्रथा आहे, ज्यात रात्र दिवसापासून वेगळी केली जाऊ शकते. असे मानले जाते की उपवासाचे आध्यात्मिक बक्षिसे रमजानमध्ये वाढतात. त्यानुसार मुस्लिम केवळ खाण्यापिण्यापासूनच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थ, लैंगिक संबंध आणि पापी वर्तनापासूनही परावृत्त करतात, नमाज आणि कुराण पठण करण्याऐवजी स्वतःला समर्पित करतात.

उपवास संपल्याच्या आनंदाव्यतिरिक्त, या ईदच्या दिवशी मुस्लिम अल्लाहचे आभार मानतात कारण अल्लाहने त्यांना महिनाभर उपवास ठेवण्याची शक्ती दिली. तथापि, उपवास करून मोक्ष कधीच शक्य नाही कारण पवित्र शास्त्रांमध्ये त्याचा उल्लेख नाही. पवित्र कुराण शरीफमध्ये बख्बर संतांकडून योग्य उपासनेचा मार्ग स्वीकारून पूर्ण मोक्ष मिळविण्यासाठी सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करण्याची सूचना देखील दिली आहे. ईदच्या काळात कुटुंब आणि मित्रांमध्ये भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. शेवई हा या सणातील सर्वात महत्त्वाचा पदार्थ आहे, जो प्रत्येकजण मोठ्या आवडीने खातात. ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिमाने मशिदींमध्ये सकाळच्या नमाजपूर्वी दान किंवा दान करणे बंधनकारक आहे, या देणगीला जकात उल-फित्र म्हणतात. हे दान कोणत्याही दैनंदिन अन्नपदार्थाचे दोन किलोग्रॅम असू शकते, उदाहरणार्थ पीठ किंवा त्या दोन किलोग्रॅमच्या किमतीचे देखील. त्यानंतर ही जकात गरिबांमध्ये वाटली जाते.

इस्लामी दिनदर्शिका चंद्रावर अवलंबून आहे, जिथे प्रत्येक महिन्याची सुरुवात होते, जेव्हा नवीन चंद्राची पहिली चंद्रकोर दिसते. इस्लामी वर्षात १२ चंद्र चक्रे असतात आणि परिणामी ते सौर वर्षापेक्षा १० ते ११ दिवस लहान असते आणि त्यात कोणतेही अंतर नसल्यामुळे रमजान संपूर्ण ऋतूंमध्ये स्थलांतरित होते. इस्लामी दिवस सूर्यास्तानंतर सुरू होतो. अनेक मुस्लिम रमजानच्या सुरुवातीस चंद्राच्या स्थानिक भौतिक दर्शनाचा आग्रह धरतात, परंतु इतर लोक महिन्याची सुरुवात निश्चित करण्यासाठी नवीन चंद्राची गणना केलेली वेळ किंवा सौदी अरेबियाची घोषणा वापरतात. जागतिक स्तरावर नवीन चंद्र एकाच वेळी एकाच स्थितीत नसल्यामुळे, रमजानच्या सुरुवातीच्या आणि समाप्तीच्या तारखा प्रत्येक संबंधित स्थानावर कोणत्या चंद्राचे दर्शन घेतात यावर अवलंबून असतात. परिणामी रमजानच्या तारखा वेगवेगळ्या देशांमध्ये बदलतात परंतु सामान्यतः फक्त एका दिवसाने, हे चंद्राच्या चक्रामुळे होते. चंद्र मेण चंद्रकोर म्हणून पात्र होण्यासाठी निकष पूर्ण करू शकत नाही, जे एका ठिकाणी सूर्यास्ताच्या वेळी आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी भेटेल तेव्हा महिन्यांतील बदलाचे वर्णन करते. खगोलशास्त्रीय अंदाज जे रमजानची सुरुवात अंदाजे उपलब्ध आहेत.

इस्लामच्या मते कुराण या महिन्यात सर्वात खालच्या स्वर्गात पाठवण्यात आले होते, अशा प्रकारे जिब्राईलने मुहम्मद यांना हळूहळू प्रकटीकरणासाठी तयार केले होते. म्हणून मुहम्मद यांनी आपल्या अनुयायांना सांगितले की स्वर्गाचे दरवाजे संपूर्ण महिनाभर उघडे राहतील आणि नरकाचे दरवाजे (जहन्नुम) बंद होतील. पुढील महिन्याचे पहिले तीन दिवस, शव्वाल, उत्सवात घालवले जातात आणि ब्रेकिंग फास्टचा सण किंवा ईद अल-फितर म्हणून साजरा केला जातो. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या या पवित्र प्रसंगी अल्लाह तुम्हा सर्वांना आनंद देवो आणि तुमच्या प्रार्थना स्वीकारो, सर्वांना ईद-ए-मिलाद-उन-नबी मुबारक!


प्रविण बागडे, नागपूर
मो.नं. ९९२३६२०९१९
ई-मेल
pravinbagde@gmail.com

# आनंदी राहण्याचा निर्णय घ्या : सुधांशु महाराज



आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही. विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## अशोकायन...

### पाडवा पहाट

नववर्षाच्या निमित्ताने –
जमलो होतो आम्ही एकत्र
प्रसन्न प्रभात, मंद संगीताने
चैत्यनाला उधाण आले सर्वत्र . .
प्रात:काली धर्माची शिकवण
पुरुषार्थांच्या कथा ऐकुण
मनाला आली उभारी
निश्चय केला ,जीवनात
घेऊ आता उंचच भरारी ..
मागे काय घडलं, पुढे काय होईल
याची करायची नाही चिंता
आपल्या उदिष्टाप्रत संयमाने
लढावयाचे आहे, पार्था तुला
आता..!


प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी देशभरात २० हजारांहून अधिक भाविकांकडून 'सामूहिक हनुमान चालीसा' पठण!

## नागपूर जिल्ह्यातील हिंदूंनी घेतला या उपक्रमाचा लाभ !



**नागपूर, ३० मार्च :** हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी सनातन संस्थेच्या वतीने आज देशभरात सामूहिक श्री हनुमान चालिसा पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने ठिकठिकाणी असलेल्या श्री हनुमान मंदिरे, श्रीराम मंदिरे यांसह अन्य शेकडो ठिकाणी २० हजारांहून भाविक, साधक, हिंदुत्वनिष्ठ सहभागी झाले. यात समविचारी संघटनांचे प्रतिनिधी, अधिवक्ते, उद्योजक, विचारवंत आदी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळीही सहभागी झाली होती. तसेच विविध या पठणाच्या कार्यक्रमात उत्साहपूर्ण सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील मोठ्या संख्येने हिंदूंनी घेतला या उपक्रमाचा लाभ घेतला.

२९ मार्च या दिवशी शनिगोचर अर्थात श्री शनिदेवानी कुंभ राशीतून मीन राशीत प्रवेश केला आहे. या शनिगोचरचा भाविकांना आध्यात्मिक स्तरावर लाभ होण्यासाठी, तसेच हिंदु राष्ट्राची लवकरात लवकर स्थापना होण्यासाठी देशभरात सामूहिक श्री हनुमान चालिसा पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. श्री हनुमान चालिसा पठणाच्या वेळी श्री हनुमंत आणि श्री शनिदेव यांच्या चरणी हिंदु राष्ट्राची लवकरात लवकर स्थापना होण्यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. या उपक्रमात सहभागी झालेल्या अनेकांनी आध्यात्मिक अनुभूतीचा लाभ घेतला, तसेच राष्ट्र आणि धर्म कार्य करतांना अशा उपक्रमांतून ऊर्जा मिळाल्याचे मनोगत भाविकांनी व्यक्त केले.

# इफ्फको, जगातील पहिल्या क्रमांकाची कोऑपरेटिव्ह

## त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२३ घोषणेचे स्वागत करत आहे

**नागपूर, ३० मार्च :** इफ्फको लोकसभेत त्रिभुवन सहकारी विद्यापीठ कायदा २०२३ विषयी करण्यात आलेल्या घोषणेचे आणि त्यानंतर २६ मार्च २०२३ रोजी कनिष्ठ सभागृहाने दिलेल्या मंजुरीचे स्वागत करत आहे. हे विधेयक जाहीर करताना माननीय सहकार आणि गृहमंत्री श्री. अमित शहा म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७३ वर्षांनंतर आज आपल्या देशाला पहिले सहकार विद्यापीठ मिळत आहे. या विधेयकामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल, स्वयंरोजगार आणि लघुउद्योग यंत्रणा विकसित होईल, सामाजिक सर्वसमावेशकता वाढेल व नावीन्य, तसेच संशोधन क्षेत्रात नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या संधीही वाढतील. एकप्रकारे सर्व देशाला सहकारवृत्तीने प्रेरित आणि आधुनिक शिक्षणाने सक्षम नवीन सहकारी नेतृत्व मिळेल.

इफ्फकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. उदय शंकर अवस्थी म्हणाले, मी त्रिभुवन सहकार विद्यापीठ कायदा २०२३ चे कौतुक करतो. सहकार क्षेत्राच्या विकासाच्या दिशेने टाकलेले हे ऐतिहासिक पाऊल आहे. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे सहकार क्षेत्रात नवी क्रांती येईल. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी आणि माननीय सहकार व गृहमंत्री श्री. अमित शहा यांनी हाती घेतलेल्या या लक्षणीय उपक्रमाचे मी कौतुक करतो. भारतीय शेती क्षेत्र, शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी हे मोठे पाऊल आहे. यामुळे आपली गावे आणखी मजबूत होतील.

ते म्हणाले, विविध क्षेत्रांशी संबंधित शाळा देशभरात स्थापन केल्याने फर्टिलायझर कोऑपरेटिव्हजना विशेषत: इफ्फकोला मदत होईल. यामुळे फर्टिलायझर कोऑपरेटिव्हज व्यवस्थापन आणि मार्केटिंग क्षेत्रासाठी नव्या दमाचे व्यावसायिक मिळतील. सध्या कोऑपरेटिव्हजमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी लहान कोर्सेस फायदेशीर ठरतील आणि आतापर्यंत इतक्या मोठ्या पातळीवर अशा प्रकारचे पाऊल उचलण्यात आलेले नव्हते. हे विद्यापीठ सध्या कार्यरत असलेले कर्मचारी आणि कोऑपरेटर्सनाही प्रशिक्षित करत, संपूर्ण क्षेत्राला त्याचा लाभ करून देईल.

या महत्त्वाच्या उपक्रमाविषयी इफ्फकोचे अध्यक्ष श्री. दिलीप संघानी म्हणाले की, यामुळे कोऑपरेटिव्ह क्षेत्राचे संभाव्य नेतृत्व, तसेच कोऑपरेटिव्हजद्वारे कोऑपरेटिव्हजसाठी चालविल्या जाणाऱ्या यंत्रणेचा विकास शक्य होईल. त्यांनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली माननीय पहिले सहकार व गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार से समृद्धी या तत्त्वानुसार अविरत घेतलेल्या मेहनतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या ऐतिहासिक धोरणामुळे येत्या काही वर्षांत सहकार क्षेत्राचा भरीव विकास होईल, असेही ते म्हणाले.

सहकार क्षेत्राचा विकास आणि विस्तार लक्षात घेत, प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे आणि त्रिभुवन सहकारी विद्यापीठ ती पूर्ण करण्यासाठी काम करेल. सहकार विद्यापीठाच्या स्थापनेनंतर डिप्लोमा व पदवीधारकांना नोकऱ्या मिळतील. या विद्यापीठाच्या माध्यमातून देशांतर्गत आणि जागतिक मूल्य साखळीसाठी मोठे योगदान दिले जाईल. नव्या युगातील सहकार संस्कृतीही या विद्यापीठापासून सुरू होईल व ते व्यावसायिक व्यवस्थापन वृत्तीचे प्रतीक असेल. या विद्यापीठासाठी प्रमाणित अभ्यासक्रम सहकार मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि देशभरातील कोऑपरेटिव्हजच्या सल्ल्याने विकसित केला जाईल.

कोऑपरेटिव्हजचे व्यवस्थापन व्यावसायिक पद्धतीने केले जावे, यासाठी कोऑपरेटिव्ह मार्केटिंगमधील खास कोर्सेस कोऑपरेटिव्हजना त्यांच्या उत्पादनांचे जागतिक स्तरावर मार्केटिंग करणे शक्य होईल. पर्यायाने एकंदर आउटपुट आणि कोऑपरेटिव्ह क्षेत्राचे उत्पन्न स्थानिक ते जागतिक तत्त्वानुसार वाढेल.

केंद्रीय सहकार मंत्री म्हणाले की, स्वातंत्र्याच्या ७३ वर्षांनंतर देशात सहकार क्षेत्रासाठी पहिले विद्यापीठ उभारले जात आहे आणि त्यामध्ये प्रत्येक वर्षी ८ लाख उमेदवारांना डिप्लोमा, पदवी किंवा प्रमाणपत्रासह पदवीधर होण्याची क्षमता विकसित केली जाईल. पर्यायाने सहकार क्षेत्राला नव्या उमेदीचे गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ मिळण्यास मदत होईल.

इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्सचे डिरेक्टर जनरल जेरॉन डग्लस यांनी व्हिडीओ मेसेजद्वारे या नव्या विद्यापीठासह भारतीय सहकार चळवळ मजबूत होईलच, शिवाय त्यात होणारी ज्ञानाची देवाण-घेवाण आणि प्रशिक्षण उपक्रम जागतिक सहकार चळवळीचे स्तंभ बनतील व या चळवळीची ताकद वाढवतील. २०२३ या वर्षात ही घोषणा केल्याबद्दल त्यांनी भारतीय नेतृत्वाचे कौतुक केले आहे, कारण हे वर्ष संयुक्त राष्ट्रातर्फे इंटरनॅशनल इयर ऑफ कोऑपरेटिव्ह म्हणून घोषित करण्यात आले आहे.

इफ्फको ही जगातील पहिल्या क्रमांकाची कोऑपरेटिव्ह (जीडीपीला दिल्या जाणाऱ्या योगदानाबाबत) असल्याचे वर्ल्ड कोऑपरेटिव्ह मॉनिटर (डब्ल्यूसीएम) अहवालात नमूद करण्यात आले असून, हा अहवाल युरसाइज व इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स (आयसीए) प्रीमियर इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह संघटनेद्वारे प्रकाशित करण्यात आला आहे.

# वेगळेपणाचा सन्मान : काळजीवाहूंचा सहभाग आणि वर्गातील सुधारणा यांचे महत्त्व या एप्रिलमध्ये का वाढते आहे?



**मुंबई, ३० मार्च :** ऑटिझमविषयीची जागरूकता आणि त्याचा स्वीकार या संदर्भातील महिना अशी एप्रिल महिन्याची ओळख आहे. या महिन्यात ऑटिझमबद्दलची सर्वसमावेशक धोरणे, त्वरीत उपचार आणि रुग्णांची काळजी घेणाऱ्या काळजीवाहूंच्या गरजांची दखल यांकडे विशेष लक्ष वेधले जाते. हा जागतिक उपक्रम १९७० मध्ये ऑटिझम सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेने सुरू केला होता. संयुक्त राष्ट्रसंघाने मान्यता दिलेल्या जागतिक ऑटिझम जागरूकता दिनाने तो २ एप्रिल रोजी अधोरेखित होतो. यावर्षीचा विषय वेगळेपणाचा सन्मान करा हा असून, न्यूरोडायव्हर्सिटी (मस्तिष्काचे वेगळेपण) स्वीकारणे आणि घरे, शाळा, कार्यस्थळे व समाजामध्ये त्याविषयी समावेशक वातावरण निर्माण करणे यावर भर दिला जात आहे.

या संदर्भात मुग्धा कालरा यांचे आय सी यू, आय गेट यू : द सेल्फ केअर गाईड फॉर स्पेशल नीड्स पेरेंट्स हे क्रांतिकारी पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण साधन म्हणून पुढे आले आहे. भारतीय समावेशन परिषद आणि भारतीय न्यूरोडायव्हर्सिटी परिषद (बंगळुरू) या परिषदांमध्ये हे पुस्तक प्रकाशित झाले होते. या पुस्तकाने कुटुंबे, शिक्षक आणि नियोक्त्यांसाठी योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे.

चळवळ निर्माण करणारे पुस्तक

मुग्धा कालरा यांचे हे पुस्तक न्यूरोडायव्हर्जंट (मस्तिष्कात वेगळेपण असलेल्या) मुलांच्या पालकांना भेडसावणाऱ्या भावनिक, आर्थिक आणि सामाजिक अडचणींवर थेट भाष्य करते. भारतात अशा मुलांना समाजातून फारसा आधार मिळत नाही. त्या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे ठरते. मुग्धा कालरा या एक पुरस्कारप्राप्त पत्रकार आहेत. २०२१मध्ये त्यांना बीबीसी १०० वुमेन हा सन्मान मिळाला होता. नॉट दॅट दिफरन्ट या चळवळीच्या त्या सह-संस्थापिका आहेत. आपल्या काळजीवाहू (केअरगिव्हर) म्हणूनच्या वैयक्तिक अनुभवातून आणि समावेशनाच्या व्यावसायिक कौशल्यातून त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे.

हे पुस्तक पालकांना स्वतःची काळजी घेण्यास मदत करणाऱ्या उपयोगी टिप्स आणि विचारपूर्ण कल्पना प्रदान करते. केवळ स्वतःसाठी म्हणून नव्हे, तर आपल्या न्यूरोडायव्हर्जंट मुलांना अधिक चांगल्या प्रकारे साथ देता यावी म्हणून पालकांनी हे पुस्तक जरूर वाचावे असे आहे. कॉर्पोरेट कंपन्यांनीही अशा पालकांसाठी काही सहायक धोरणे तयार करावीत, कारण या पालकांना सक्षम केल्यास संपूर्ण दिव्यांग समुदायाची परिस्थिती सुधारू शकते, असा संदेश हे पुस्तक देते.

जेव्हा कंपन्या काळजीवाहूंना नोकरी देतात, तेव्हा त्या संपूर्ण कुटुंबांना अधिक स्थिर आणि समाधानकारक जीवन जगण्याची संधी देतात. अशा प्रकारच्या मदतीमुळे अपंगत्व असलेल्या समाजात आत्मविश्वास आणि स्वायत्ततेचा प्रसार होतो, असे मुग्धा कालरा स्पष्ट करतात.

# एप्रिल फूल्स डे स्पेशल: सेलेब्रिटी आठवण काढत आहेत त्यांच्या सर्वांत मस्त प्रँक क्षणांची!

**मुंबई, ३० एप्रिल :** एप्रिल फूल्स डे दरवर्षी १ एप्रिल रोजी साजरा केला जातो आणि हा दिवस हास्य, निखळ मस्ती आणि मजेदार खोड्यांसाठी समर्पित आहे. याची मूळ सुरूवात कधी झाली हे एक कोडे असले तरी विभिन्न संस्कृतींमध्ये एकमेकांची निर्दोष मस्करी करण्याची ही प्रथा अनेक शतकांपासून पाळण्यात येत आहे. लहानसा प्रॅक्टिकल विनोद असो किंवा मोठी थट्टा, हा दिवस आपल्याला आयुष्याला सहजपणे घेण्यासाठी आणि आपल्या निकटवर्तीयांसोबत आनंदाचे हे क्षण जगण्याची आठवण करून देतात. ह्याच परंपरेला कायम राखत झी टीव्हीवरील काही लाडके कलाकार भाग्यलक्ष्मीमधील ऐश्वर्या खरे, जागृति एक नयी सुबहमधील आर्य बब्बर, कुमकुम भाग्यमधील अक्षय देव बिंद्रा, जाने अनजाने हम मिलेमधील भरत अहलावत, वसुधामधील प्रिया ठाकूर आणि कैसे मुझे तुम मिल गयेमधील आकांक्षा चमोला यांनी आपले एप्रिल फूल्स डे चे अनुभव, त्यांनी काढलेल्या खोड्या आणि जेव्हा ते स्वतःचे थट्टेचा विषय बनले त्या क्षणांबद्दल सांगितले.

झी टीव्हीवरील भाग्य लक्ष्मीमधील लक्ष्मीच्या भूमिकेतील ऐश्वर्या खरे म्हणाली, एप्रिल फूल्स डे हा एक असा दिवस आहे ज्या दिवशी तुम्ही कोणावरही भरवसा ठेवू शकत नाही, अगदी तुमच्या जवळच्या दोस्तांवरही. मला प्रँक्स करायला मनापासून आवडतात. पण अनेकदा मी स्वतःसुद्धा त्यांची शिकार बनले आहे. एकदा आम्ही भाग्य लक्ष्मी च्या सेटवर असताना रोहितने हळूच माझी सकाळची कॉफी खारट बनवली आणि एका अगदी गंभीर दृश्याच्या आधी मी त्या कॉफीचा मोठा घोट घेतला. माझा चेहरा सरळ राहावा यासाठी मी खूप प्रयत्न केले पण ते खरंच कठीण होते. त्यानंतर एकदा कोणीतरी माझ्या फोनची रिंगटोन कुठलातरी भयानक प्राण्याच्या आवाजाची करून ठेवली होती आणि अगदी एका गंभीर दृश्यामध्ये माझा फोन गाढवाच्या आवाजात अक्षरशः रेकला. ते ऐकून सगळेच हसू लागले आणि मला मोठ्या प्रयत्नांनी स्वतःला शांत करावे लागले. एप्रिल फूल्स डे चा सर्वोत्तम भाग म्हणजे ती सगळी मस्ती असते आणि हास्याचे हे एकत्र क्षणच टीम म्हणून आमच्यातील नाते दृढ करत असतात. तेव्हा १ एप्रिलला मजा करा, काही छोट्या खोड्या काढा आणि भरपूर हसायला विसरू नका.

झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबहमधील कलिकांतच्या भूमिकेतील आर्य बब्बर म्हणाला, प्रँक्स करणे तर माझ्या स्वभावातच आहे. खरंतर एप्रिल फूल्स डे हे माझ्यासाठी केवळ एक निमित्त आहे. मी तर हे अख्खे वर्षच करत असतो. जागृति एक नयी सुबहच्या सेटवर माझे सहकलाकार कायमच सतर्क असतात कारण त्यांना कधीच माहिती नसते की पुढे काय होऊ शकेल. एकदा मी माझ्या सहकलाकाराच्या अलार्ममध्ये माझा किंचाळत असलेला वेक अप! यु आर लेट असा आवाज ठेवला होता आणि तो बिचारा तर ते ऐकून घाबरलाच. घरीसुद्धा माझ्या पत्नीने माझ्या खोड्यांसमोर हात टेकले आहेत. मी अनेकदा तिच्या जेवणात जास्त मीठ टाकले आहे त्यामुळे आता अनेकदा ती मलाच पहिला घास खायला लावते. मी ऑनस्क्रीन भले क्रूर कलिकांतची भूमिका साकारत असेन, पण ऑफस्क्रीन मी धमालमस्ती करण्यासाठी जगतो. सर्वांना निर्दोष खोड्या आणि कधीही न संपणाऱ्या निखळ हास्यासाठी ह्या एप्रिल फूल्स डे च्या शुभेच्छा.

झी टीव्हीवरील कुमकुम भाग्यमधील रौनकच्या भूमिकेतील अक्षय देव बिंद्रा म्हणाला, मी तर लहानपणापासूनच प्रँकस्टर राहिलो आहे. शाळेत असताना मी अनेकदा माझ्या दोस्तांच्या पाठीवर किक मी चिकटवले होते किंवा अदृश्य शाई असलेल्या मार्कर्ससोबत व्हाईटबोर्ड मार्कर्स बदलले होते. आजही एखादा मस्त प्रँक सुचला तर तो केल्यापासून मला राहावत नाही. हल्लीच सेटवर माझा एक सहकलाकार मेकअप रूममध्ये असताना मी दिवे घालवले आणि भुताचे संगीत वाजवले. ते ऐकून तो जो घाबरला होता ते कमाल होते. एकदा एका ॲपचा वापर करून मी माझ्या दिग्दर्शकांना हे पटवून दिले की त्यांच्या फोनची काच फुटली आहे. त्यांना ते पाहून धक्काच बसणार होता जेव्हा मी प्रँकची कबुली दिली. सर्वोत्तम प्रँक्स ते असतात ज्यामुळे लोक हसतात आणि मूड थोडा हलका होतो. कायम गंभीर राहण्यासाठी आयुष्य खूपच लहान आहे, त्यामुळे ह्या एप्रिल फूल्स डे ला आपल्या ह्या खोड्यांचे चैतन्य जीवंत राखूया.

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिलेमधील राघवच्या भूमिकेतील भरत अहलावत म्हणाला, दर दिवशी आमच्या सेटवर एप्रिल फूल्स डे आहे असेच वाटत असते कारण आम्ही कायमच एकमेकांच्या खोड्या काढत असतो. मला प्रँकस्टर बनताना मजा येते, पण माझ्यासोबतही अनेक वाईट प्रँक्स करण्यात आले आहेत. एकदा आयुषीने माझ्या फोनची भाषाच बदलून टाकली होती, जी मला वाचता येत नव्हती आणि मग ती पुन्हा बदलण्यासाठी मी जवळजवळ अर्धा तास घालवला. एकदा तर मी माझी सहकलाकार सहजची स्क्रिप्ट अगदी खोट्या स्क्रिप्टसोबत बदलली होती. त्या विचित्र स्वगत संवादाचा सराव ती करू लागली आणि मग नंतर तिला कळले की मी तिची खोडी काढली आहे. जाने अनजाने हम मिलेच्या सेटवरील हे खेळकर क्षण आमच्या कामाला मजेदार आणि संस्मरणीय बनवतात. त्यामुळे ह्या १ एप्रिलला सरप्राईजेसचा स्वीकार करा, हास्याचा आनंद घ्या आणि कायम सतर्क राहा.

झी टीव्हीवरील वसुधामधील वसुधाच्या भूमिकेतील प्रिया ठाकूर म्हणाली, एप्रिल फूल्स डे ची परंपरा मी अतिशय गंभीरपणे पाळते की असं म्हणू मस्तीने पाळते. लहानपणापासून माझे दोस्त आणि मी अनेक हुशार आणि हलकेफुलके प्रँक्स जसे साखरेच्या जागी मीठ ठेवणे ते मोठमोठी सरप्राईजेस यांचे प्लॅनिंग केले आहे. आजही वसुधाच्या सेटवर इशांक आणि मी आमच्या सहकलाकारांवर कसे प्रँक करता येतील याचा विचार करत असतो. एकदा आम्ही आमच्या दिग्दर्शकांना हे पटवून दिले होते की कॅमेरा नीट चालत नाहीये आणि त्यांनी जवळजवळ बॅकअपसाठी बोलावलेच होते आणि आम्हांला हसू फुटले. ह्यावर्षी आम्ही अगदी अनपेक्षित गोष्टीची योजना बनवली आहे आणि सर्वांच्या प्रतिक्रिया पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. बेस्ट प्रँक्स ते असतात जे आनंद आणतात आणि एप्रिल फूल्स डे याचबद्दल तर आहे.

झी टीव्हीवरील कैसे मुझे तुम मिल गयेमधील मानवीच्या भूमिकेतील आकांक्षा चमोला म्हणाली, एप्रिल फूल्स डे च्या दिवशी मी माझ्या आजूबाजूच्या सगळ्यांकडे संशयी नजरेने पाहते. लहानपणापासूनच आमच्या येथील लहान मुले एक गँग बनवून मोठ्यांच्या खोड्या काढायचे आणि आता मी स्वतः १ एप्रिलला एकदम हाय ॲलर्ट वर असते. मात्र, मला हेही समजले आहे की जेव्हा सगळ्यात कमी अपेक्षा असते तेव्हाच बेस्ट प्रँक्स घडतात. त्यामुळेच मी एप्रिल फूल्स डे च्या आधी किंवा नंतर माझ्या खोड्यांचा हल्ला करते. ह्यावर्षी मी माझ्या नवऱ्यावर प्रँक करणार असून त्याला काहीतरी धक्कादायक खोटी बातमी देईन. बघूया तो त्यावर कशी प्रतिक्रिया देतो. ही सगळी मजा असणार आहे आणि दिवसाच्या शेवटी आम्ही त्यावर एकत्र हसू. सर्वांना मस्त आणि खोडकर एप्रिल फूल्स डे च्या शुभेच्छा.

# प्राचीन जैन तीर्थक्षेत्राचे संवर्धन व जीर्णोध्दार करणार : ललित गांधी

**नागपूर, ३० मार्च :** प्राचीन जैन तीर्थक्षेत्राचे संवर्धन व जीर्णोध्दार करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी नागपुरात गुरुवारी जैन समाजाच्या नागरिकांशी आशीर्वाद भवन लाडपुरा इतवारी येथील नितीन नखाते यांच्या निवासस्थानी संवाद साधला.

अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय महामंत्री नितीन नखाते यांनी ललित गांधी यांचा शाल, श्रीफळ व धर्म दुपट्टा देऊन सन्मान केला. वैशाली नखाते यांनी ललित गांधी यांचे औक्षण केले. आपल्या व्यस्त दौऱ्यात त्यांनी धावती भेट देऊन पुढे सांगितले प्राचीन जैन ग्रंथ आहेत त्यासाठी निधी नसल्याने जतन करता येत नव्हते. आता ते काम शासनाद्वारे होईल. जैन समाजाचे मूलभूत तत्व अहिंसा आहे. अल्पसंख्यांक असले तरी विसंगत संस्थेसोबत बसतांना अस्वस्थ रहायचे त्यामुळे जैन समाजामध्ये शासन योजनांची उदासीनता राहिली. तीर्थक्षेत्रांचा जीर्णोध्दार, युवकांना उद्योगासाठी कर्ज व समाजाच्या नागरिकांना स्वतःच्या घरासाठी बिन व्याजी कर्ज देणारे पहिले महामंडळ आहे. धार्मिक शिक्षण देणाऱ्या पाठशाळा आहेत, तेथे प्राकृत भाषेचे शिक्षण दिल्या जाते. केंद्र सरकारने या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. या पाठशाळांना अनुदान देण्यात येणार आहे. जैन समाजात धार्मिक व सामाजिक, सुरक्षा, शैक्षणिक, आर्थिक सक्षमीकरण याचा समावेश असणारे महामंडळ शासनाने तयार केले आहे. याद्वारे समाजात शासन योजनांची माहिती देण्यात येईल. यासोबत जनजागृती करण्यात येईल.

# लाइट्स, कॅमेरा, खोड्या! सोनी सबच्या कलाकारांनी सेट्सवर अनुभवलेले मजेदार एप्रिल फूल क्षण शेअर केले

**मुंबई, ३० एप्रिल :** एप्रिल फूलचा दिवस म्हणजे हसण्याचा, मिश्किलीचा आणि खोड्या काढण्याचा दिवस! १ एप्रिलरोजी हा दिवस साजरा होतो आणि निरुपद्रवी मस्तीसाठीचे औचित्य तेव्हा साधता येते. या दिवसाची मस्तीची भावना जिवंत ठेवत सोनी सबचे कलाकार सांगत आहेत त्यांनी सेटवर आपल्या सह-कलाकारांसोबत अनुभवलेले एप्रिल फूलचे क्षण!

वागले की दुनिया मालिकेत सखीची भूमिका करणारी चिन्मयी साळवी म्हणते, तुमच्यातील मस्तीखोर मूल बाहेर काढून निरुपद्रवी मस्ती करण्यासाठी १ एप्रिल हा अगदी योग्य दिवस आहे. वागले की दुनियाच्या सेट्सवर आम्ही नेहमी एकमेकांच्या खोड्या काढत असतो. एकदा परिवा दीदीला विश्वासात घेऊन आम्ही सुमित सरांना हे पटवून देण्याचा प्रयत्न केला होता की आयत्या वेळी एक भावनिक दृश्य घेतले आहे. त्यांनी तर तयारी सुरू केली आणि मग त्यांना समजले की आम्ही मजा करत आहोत. या शोमधली सगळ्यात छान गोष्ट ही आहे की, आम्ही पडद्यावर आणि पडद्याच्या मागे देखील एका खऱ्याखुऱ्या कुटुंबासारखेच असतो.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत राशीची भूमिका करणारी देशना दुगड म्हणते, मला नेहमी असे वाटते की आपण पुरेशा स्मार्ट आहोत, पण एप्रिल फूलच्या दिवशी मी जरा जास्तच सतर्क असते कारण कोण तुमची खोडी काढेल हे सांगता येत नाही. १ एप्रिल हा असा दिवस असतो, ज्या दिवशी तुम्ही कोणावरच विश्वास ठेवू शकत नाही. जर कुणी सांगितले की शूटिंग रद्द झाले आहे किंवा जेवण आज लवकर होणार आहे.. तर ही तुमची फिरकी घेतलेली असू शकते. खोड्यांबद्दल सांगायचे, तर सेटवर आम्ही असे काही धमाल क्षण अनुभवले आहेत. एकदा, मी गरिमाशी संगनमत करून आमच्या दिग्दर्शकांना पटवून दिले की मी माझे संवाद सपशेल विसरून गेले आहे. त्यावर त्यांचा त्यांचा चेहरा वैतागाने असा काही झाला! ही सगळी निखळ मस्ती असते आणि म्हणूनच दिवसभर शूटिंग चालले तरी पुष्पा इम्पॉसिबलमध्ये काम करताना मजा येते. आणि मस्ती नसेल तर ते जीवनच काय!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत चिरागची भूमिका करणारा दर्शन गुर्जर म्हणतो, एप्रिल फूलचा दिवस म्हणजे मस्ती आणि पुष्पा इम्पॉसिबलच्या सेट्सवर खोड्या काढण्याची एकही संधी आम्ही सोडत नाही. एकदा मी आणि नवीनने मिळून एका क्रू सदस्याची खोडी काढली होती. त्याच्या फोनचा वॉलपेपर बदलून तुटलेल्या स्क्रीनसारखा ठेवला आणि त्याचा फोन तुटला असल्याची बतावणी केली. खरा प्रकार काय आहे ते कळेपर्यंत तो बिचारा घाबरून गेला. त्यामुळे मी हा सल्ला देईन की, सतर्क रहा आणि कोणत्याही गोष्टीवर लगेच विश्वास ठेवू नका. एप्रिल फूल दिनाच्या शुभेच्छा!

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस अपेक्षित फळ देणार असणार आहे. नोकरी करणाजयांनी वरिष्ठांच्या सूचनेचे पालन करावे. तसेच वेळेत काम करण्याचा प्रयत्न करा अन्यथा तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**वृषभ :** आज तुमच्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी घडताना दिसणार आहेत. तुमची दीर्घकाळापासून प्रलंबित कामे लवकर पूर्ण होतील. आज तुमच्या लोकप्रियतेत वाढ होईल. तब्येतीकडे लक्ष पुरवा.

**मिथुन:** राशींच्या व्यक्तींना आज अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागू शकते. यामुळे तुमचे रागावरील नियंत्रण कमी होईल. लोकांशी वाद घालणे टाळा. खर्च वाढू शकतो. ज्यामुळे बजेट बिघडू शकते.

**कर्क :** जर तुम्ही परदेशात करिअर किंवा व्यवसाय करण्याचा प्रयत्न करत असाल तर त्यात तुम्हाला यश मिळेल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्याल. आजचा दिवस आनंद देणार असणार आहे.

**सिंह :** राशीच्या व्यक्तींनी आज कोणतीही समस्या उद्भवली तर संयम गमावू नका. शांत मनाने विचार करा. नोकरी करणाजया लोकांवर अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो. तुम्हाला अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**कन्या :** पैशांची गुंतवणूक टाळा. प्रवासादरम्यान विशेष काळजी घ्या. इतरांशी नम्रतेने वागले पाहिजे. प्रवास आनंददायी ठरेल आणि नवीन मित्र मिळतील. व्यवसाय करण्यापूर्वी तुमच्या हितचिंतकांचा सल्ला घ्या.

**तुळ :** आर्थिक दृष्टिकोनातून आजचा तुमच्यासाठी उत्तम असेल. नोकरी करणाजयांसाठी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. वैवाहिक जीवन आनंदी राहील. आज प्रेमसंबंधात कोणताही मोठा निर्णय शहाणपणाने घ्या.

**वृश्चिक :** वैवाहिक जीवनात आनंद राहील. मीन राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस धावपळीचा असेल. तुमच्यावर कामाचा अतिरिक्त ताण असेल. अनावश्यक खर्च करणे टाळा. धोकादायक गुंतवणूक टाळा.


**धनु :** आज तुमची खूप जास्त धावपळ होईल. जमीन किंवा घर खरेदी-विक्री व्यवहाराबद्दल कागदपत्रे नीट तपासा. आर्थिक व्यवहारात काळजी घ्या. एखाद्या गोष्टीवरून तणाव निर्माण होऊ शकतो.

**मकर :** इतरांची दिशाभूल करू नका. परस्पर समन्वय बिघडू देऊ नका. आनंदात वाढ होईल. आज कामाच्या ठिकाणी अडथळे कमी होतील. तुमच्या कामाच्या कौशल्याने तुम्ही लोकांना प्रभावित कराल.

**कुंभ :** राजकीय क्षेत्रात नवीन सहयोगी लाभदायक ठरतील. नोकरीत बढती होईल. आज व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. वडिलोपार्जित संपत्ती मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** व्यापार क्षेत्रात शुभ संकेत मिळतील. घाईगडबडीत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. नोकरी मिळविण्यासाठी तुम्हाला अजून थोडा वेळ वाट पाहावी लागेल. प्रेमसंबंधात दिखावा टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २०७१




**आडवे शब्द :-**
१) प्रचीती
५) एखाद्यास फडाफडा बोलणे (वा प्र.)
९) युद्धासाठी उताविळ झालेला
१२) वेगळा
१३) गौप्यस्फोट गुप्तगोष्ठ फोडणे
१४) वरवधूची मिरवणूक
१५) घट्ट मारलेला विळखा
१७) कोवळी फांदी
१९) देवदासी
२०) गीत
२२) गोष्ट
२४) गोणपाट
२५) चपलता, नवा जोम
२८) स्क्रू ड्राइवर
३२) तादाम्य, एकरूप
३५) दोन वेळा
३६) प्रजेची खुषी
३९) गणित आणि अणुचे संशोधन करणारा ऋषी
४०) गवंडी
४१) विशेष
४२) मृत्तिका
४३) अजगर
४४) गंध
४६) रात्र
४७) स्तुती करणारा
४८) वडिलांचा भाऊ
५०) दासांचा सेवक
५३) पदर
५४) साखर, गुळाचा रस
५५) दात
५६) उन्नती, उत्कर्ष, चलती
५९) सापाने टाकलेली त्वचा
६१) काळे ज्वालाग्रही खनिज
६३) प्रजा
६५) संकोच, बंधन
६६) कैफी पदार्थ
६७) उसळणे, अन्न, पाणी घशाशी येणे
६८) जंगली
६९) धोबी
७१) मध्यम प्रमाण
७३) काम, नशीब
७४) सापाची एक जात
७५) वार्ताहर
७६) अभिप्राय

**उभे शब्द :-**
१) भाषांतर करणारा
२) मालाने भरून आणलेल्या गाड्यांची खेप
३) माराची उमटलेली खूण
४) पती
६) अस्थिर,
७) बातमी
८) जेवू घालणारा
१०) बावळट मुलगी
११) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१६) बरोबरची खूण
१८) सोने
२१) चौकशी, विचारपूस
२३) थापा मारणारा
२६) उसाचे गुऱ्हाळ
२७) अस्वल
२९) खंदक
३०) नशा आणणारा एक पदार्थ
३१) मयूर
३३) दहावी रास
३४) फ्लॅट, शहरातील छोटे घर
३५) दोन वेळा
३७) बारा वर्षाचा काळ
३८) जावई
४१) संसद सदस्य
४३) कहाणीतील गाव
४५) नम्रपणाची वृत्ती, मनधरणी
४६) गाढव
४८) कावळ्यांचे ओरडणे
४९) भरीवच्या विरुद्ध
५१) पाठविणे, हजर करणे
५२) आकाश
५४) वाघूळ, एक लहानसा प्राणी
५७) दागदागिने
५८) कष्ट करणे
६०) चलाख, हुशार
६२) सामान्य
६४) थेट, सरळ
६५) आश्रय, थारा
६८) उणेपणा, चिलखत
७०) सोन्याचा धागा
७१) पावसाची झड
७२) सारखा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कॅलिडोस्कोप

## बँकेच्या मातीला सोन्याचे दाम!

बरेच लोक काही गोष्टींना खूप महत्त्वपूर्ण आणि भाग्यदायी मानतात. काहींचा विश्वास असतो की, आपल्याकडे ठराविक गोष्टी असतील तर नशीब नक्कीच साथ देईल. यामुळेच लोक अशा वस्तूंच्या शोधासाठी कितीही पैसा खर्च करण्यास तयार असतात. स्वाभाविकच काही दुकानदार याचा फायदा घेतात. अशाच प्रकारे सध्या चीनमध्ये एका बँकेची माती लोकांसाठी भाग्यदायी ठरत आहे आणि लोक त्यासाठी मागेल ती किंमत मोजायला तयार आहेत.

चीनमध्ये सध्या नशीब उजळवून टाकणाऱ्या बँकांचा हा धंदा सुरू आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोक त्यासाठी मागेल तेवढी किंमत मोजायला तयार आहेत. 'एससीएमपी'च्या म्हणण्यानुसार, या तथाकथित बँकेतील मातीची किंमत प्रचंड पैसा मिळवून देत आहे. बँकेत ठेवलेल्या भांडी आणि नोटांमधून ही धूळ उडत असून ती खरेदी केल्याने संपत्ती आणि सौभाग्य मिळते, असा लोकांचा विश्वास आहे.

दुकानदार माती कुठून आणत आहे?

मीडिया रिपोर्टनुसार, एक दुकानदार चार प्रकारची माती विकतो जी कथित पाच मुख्य चीनी बँकांमधून आणली जाते. या पाच बँका म्हणजे कृषी बँक ऑफ चायना, चायना कन्स्ट्रक्शन बँक, बँक ऑफ चायना, इंडस्ट्रियल अँड कमर्शियल बँक ऑफ चायना आणि बँक ऑफ कम्युनिकेशन्स या आहेत. त्यांना चीनच्या सर्वात श्रीमंत बँका समजले जाते. या पाच बँकांमधून माती गोळा करण्यात आल्याचे दुकानदाराचे म्हणणे आहे.

मातीची धूळ २७५ रुपयांना

या मातीचा सर्वात स्वस्त भाग २४ युआन (जवळपास २७५ रुपये) इतक्या किमतीमध्ये विकला जात आहे. ही माती घरात ठेवल्याने धन वाढते आणि घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते, असा विश्वास असल्यामुळे लोक ती खरेदी करत आहेत. दुकानदार दुपारी ही माती गोळा करतो आणि संध्याकाळी विक्रीस ठेवतो. या मातीने घरात सौभाग्य येण्याची शक्यता ९९.९९ टक्के असल्याचा संबंधित दुकानदाराचा दावा आहे.



## चंद्रावर बर्फ आढळल्याने वैज्ञानिक आश्चर्यचकित



**'इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन' (इस्रो) च्या चांद्रयान-३ मोहिमेतून मिळालेल्या ताज्या आकडेवारीने शास्त्रज्ञांना आश्चर्यचकित केले आहे. नवीन संशोधनानुसार, चंद्राच्या पृष्ठभागाखाली पूर्वी वर्तवलेल्या अंदाजापेक्षा जास्त बर्फ असू शकतो. हा शोध केवळ वैज्ञानिकांसाठीच नाही तर भविष्यात चंद्रावर वसाहती स्थापन करण्याच्या माणसाच्या स्वप्नाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.**

२३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ चे विक्रम लँडर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यशस्वीरित्या उतरले. तेव्हापासून ते महत्त्वपूर्ण डेटा पाठवत आहे. आता त्याने चंद्राच्या पृष्ठभागाखालील बर्फाच्या संभाव्य साठ्याकडे लक्ष वेधले आहे. अहमदाबादच्या भौतिक संशोधन प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञ दुर्गा प्रसाद करनम यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेला हा अभ्यास 'जर्नल कम्युनिकेशन्स अर्थ अँड एन्व्हायर्नमेंट' मध्ये नुकताच प्रकाशित झाला आहे.

**चंद्राच्या तापमानामुळे रहस्य**

चांद्रयान-३ च्या विक्रम लँडरमध्ये स्थापित सीएचएएसटीई अर्थात सरफेस थर्मोफिजिकल एक्सपेरिमेंट नामक उपकरणाने चंद्राच्या पृष्ठभागाच्या खाली १० सेंटीमीटरपर्यंतचे तापमान मोजले. यातून समोर आलेल्या आकडेवारीने शास्त्रज्ञांना आश्चर्याचा धक्का बसला. लँडरची लँडिंग साइट सूर्याकडे झुकलेली होती आणि तिचा उतार सहा अंश असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. या ठिकाणचे तापमान ८२ अंश ते -१७० अंश सेल्सिअसपर्यंत असल्याचे आढळून आले. फक्त एक मीटर अंतरावर असणाऱ्या सपाट पृष्ठभागावरील तापमानच ६० अंश सेल्सियसच्या आसपास होते. या छोट्याशा उतारामुळे अधिक सौर किरणे पृष्ठभागावर पडली होती. त्याचा तापमानावर परिणाम झाला आणि बर्फ निर्मितीच्या प्रक्रियेतही बदल झाला, असा अंदाज संशोधकांकडून वर्तवण्यात आला आहे.

**चंद्रावर बर्फ कुठे असू शकतो?**

संशोधकांनी एक मॉडेल विकसित केले आहे. ते दर्शविते, की पृष्ठभाग १४ अंश किंवा त्याहून अधिक झुकलेला असेल आणि थेट सूर्यप्रकाशापासून संरक्षित असेल तर बर्फ जमा होण्याची शक्यता वाढते. म्हणजेच चंद्राच्या ध्रुवीय प्रदेशात अनेक ठिकाणी बर्फ असू शकतो. हा शोध केवळ वैज्ञानिकांसाठीच नाही तर भविष्यात चंद्रावर मानवी मोहिमा पाठवण्याच्या योजनांसाठीही अतिशय महत्त्वाचा आहे.

चंद्रावर पाणी सापडेल का?


चंद्रावरील बर्फापासून पाणी बनवता येते का? या प्रश्नावर शास्त्रज्ञ करनम यांनी सांगितले, की चंद्राच्या पृष्ठभागावर उच्च निर्वात पोकळीची स्थिती आहे. त्यामुळे बर्फ वितळण्याऐवजी थेट वायूमध्ये बदलेल. म्हणजे चंद्रावर द्रवरूप पाणी मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, बर्फ काढण्यासाठी आणि वापरण्यासाठी नवीन तंत्र विकसित करणे महत्त्वाचे आहे. हे साधले तर भविष्यात चंद्रावर मानवी वसाहती निर्माण करता येतील.

## समुद्रात जहाजाचे इंधन संपले तर ते बुडेल का?

कारमधून जात असताना अचानक इंधन संपले तर काय होईल? साहजिकच गाडी बंद पडेल. त्याचप्रमाणे विमानातील इंधन संपले तर ते जमिनीवर पडेल. परंतु, समुद्राच्या मध्यभागी जहाजाचे इंधन संपले तर काय होईल? कदाचित तुम्ही विचार करत असाल की जहाजही बुडेल. मात्र तसे होत नाही. कारण जहाजाची रचनाच अशा प्रकारे करण्यात आलेली असते, की इंधन संपले तरी ते पाण्यावरच तरंगत राहते. अर्थातच यामागे विज्ञान आहे. जहाजे प्रवासी तसेच मालवाहतुकीसाठी वापरली जातात. खेरीज केवळ लांबच्या प्रवासासाठीच जहाजे वापरली जात नाहीत तर मोठ्या प्रमाणात मालाची वाहतूक करण्यासाठी तसेच जवळच्या प्रवासासाठीही त्यांचा वापर केला जातो. आकडेवारीवर नजर टाकली तर जगातील ९० टक्के व्यापार जहाजातून होत असल्याचे चित्र समोर येते. जलवाहतूक ही व्यवसाय करण्याची एक जुनी पद्धत आहे. स्वाभाविकच जहाजे एका ठोस तत्त्वावर बांधली जातात. आर्किमिडीजचे तत्त्व लक्षात घेऊन जहाजांची रचना केली जाते. यानुसार, पाण्यात बुडवलेल्या वस्तूवरील ऊर्ध्वगामी बल हे वस्तूने विस्थापित केलेल्या पाण्याच्या वजनाइतके असते. तथापि, जहाजांची रचना विशिष्ट प्रकारे केली जात असल्यामुळे त्याची घनता पाण्यापेक्षा खूपच कमी होते आणि ते पृष्ठभागावर तरंगत राहते. सोप्या भाषेत सांगायचे तर जहाजाचे वजन ते विस्थापित केलेल्या पाण्याच्या वजनापेक्षा कमी होते. त्यामुळे इंधन संपल्याच्या कारणामुळे ते कधीही बुडत नाही तर पाण्यावर तरंगत राहते.

जहाज कधी बुडते?

समजा, जहाजातील इंधन संपलेच तर ते पाण्यावर स्थिर होते आणि लाटांमुळे इकडे तिकडे हेलकावू लागते. ते बुडत नाही. मात्र अशा नुसत्याच तरंगणाऱ्या जहाजातही पाणी शिरु शकते. ते काढण्यासाठी पंपाचा वापर केला जातो. मात्र इंधन संपल्यामुळे हे पंपही बंद पडले तर काही वेळाने त्यात पाणी भरण्याचा धोका असतो. मग मात्र ते जहाज बुडण्याच्या स्थितीत येण्याचा मोठा धोका उद्भवू शकतो.



## २५ हजार कोटींच्या घरात राहते

भारतातील सर्वांत सुंदर महिला!

१५ हजार कोटी... भारतातील प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील 'अँटीलिया' या निवासस्थानाची ही किंमत आहे. अँटीलिया हे जगभरातील सर्वात महागड्या घरांपैकी एक गणले जाते. मात्र भारतातील सर्वात सुंदर महिला अँटीलियापेक्षाही भव्यदिव्य राजमहालात राहते. 'लक्ष्मी विलास पॅलेस' असे या राजमहालाचे नाव आहे. गुजरातमधील 'लक्ष्मी विलास पॅलेस' ब्रिटनच्या प्रसिद्ध बकिंगहॅम पॅलेसपेक्षाही मोठा आहे.

'लक्ष्मी विलास पॅलेस' बडोद्याचे राजघराणे असणाऱ्या गायकवाड कुटुंबाचे निवासस्थान आहे. हा राजवाडा गायकवाडांचा राजमहाल आहे. हे जगातील सर्वात मोठे खासगी निवासस्थान असून यासमोर अनेक श्रीमतांची घरे फिकी पडतात. गायकवाड कुटुंबीय या पॅलेसचे मालक आहे. राजघराण्याचे प्रमुख समरजीतसिंह गायकवाड पत्नी राधिकाराजे गायकवाड आणि कुटुंबासह या वाड्यात राहतात. २०१३ पासून ते कुटुंबासह या महालात आलिशान जीवनशैली जगत आहेत.

मराठा साम्राज्याच्या वैभवाची झलक

महाराजा सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांनी १८९० मध्ये 'लक्ष्मी विलास पॅलेस' बांधला होता. मराठा साम्राज्याचे वैभव कसे होते, याची झलक या राजवाड्यात पाहायला मिळते. एकेकाळी गायकवाड कुटुंबाने बडोद्यावर राज्य केले होते. आजमितीस समरजीत सिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांची संपत्ती २० हजार कोटींच्या आसपास आहे. २००२ मध्ये त्यांचा विवाह राजकुमारी राधिकाराजे यांच्याशी झाला. त्यांना दोन मुली आहेत.

तीन कोटी चौरस फुटाचे घर

तीन कोटी चार लाख ९२ हजार चौरस फूटमध्ये 'लक्ष्मी विलास पॅलेस' विस्तारलेला आहे. जगातील सर्वात महागडे घर असणाऱ्या ब्रिटनचा बकिंगहॅम पॅलेस ही याच्यापेक्षा आकाराने लहान आहे. बकिंगहॅम पॅलेसचा विस्तार केवळ आठ लाख २८ हजार ८२१ चौरस फूट इतका आहे. जगातील सर्वात महागड्या घरांच्या यादीत दुसऱ्या स्थानी असणारे मुकेश अंबानी यांचे 'अँटिलिया हाऊस' केवळ ४८ हजार ७८० चौरस फूट आकाराचे आहे. 'लक्ष्मी विलास पॅलेस' मध्ये १७० पेक्षा अधिक खोल्या आहेत. या वास्तूची किंमत जवळपास २५ हजार कोटी इतकी आहे.



## जेसीबीची रंजक कथा



खोदकामासाठी किंवा ढिगारा उचलण्यासाठी जेसीबीचा वापर केला जातो. अलिकडे तर कोणा मंत्र्याच्या स्वागतासाठीही भलामोठा हार घालताना वा पुष्पवृष्टी करण्यासाठीही या यंत्राचा वापर वाढत आहे.

असो... जेसीबी पिवळ्या रंगाची असते. जेसीबी जगभरात वापरली जाते. या उपकरणाला आपण जेसीबी याच नावाने ओळखतो. या उपकरणाची रंजक माहिती जाणून घेऊ.

जेसीबी ही ब्रिटनमधली एक कंपनी आहे. याचं मुख्यालय इंग्लंडमधल्या स्टॅफर्डशायर शहरात आहे. जेसीबी या उपकरणाची निर्मिती १९४५ मध्ये करण्यात आली. तेव्हा या उपकरणाला काहीच नाव देण्यात आलं नव्हतं. निर्मात्यांनी याच्या नावाबाबत बरंच चर्वितचर्वण केलं. पण सुयोग्य नाव न मिळाल्याने निर्माते जोसेफ सायरिल बमफोर्ड यांच्या नावाची अद्याक्षरं जोडून जेसीबी असं नाव देण्याचं ठरलं. आज हीच या उपकरणाची ओळख बनली आहे. जेसीबी ही भारतात कारखाना सुरू करणारी पहिली खासगी ब्रिटिश कंपनी आहे. आज जेसीबी उपकणांची सर्वाधिक निर्यात भारतातच केली जाते. १९४५ मध्ये जोसेफ बमफोर्ड यांनी सर्वात पहिल्यांदा एक टिपिंग टेलर तयार केला होता. त्यावेळी त्याची किंमत ४५ पाउंड होती. जेसीबीने १९९१ मध्ये जगातला सर्वात जलद 'फास्टट्रॅक' नावाचा ट्रॅक्टर तयार केला होता. १९४८ मध्ये या कंपनीत फक्त सहा लोक काम करत होते. सुरुवातीच्या काळात जेसीबी उपकरणांना लाल आणि पांढरा रंग दिला जायचा. मात्र नंतर हे उपकरण पिवळ्या रंगातच उपलब्ध करून देण्यात आलं. जेसीबीचा वापर खोदकामासाठी केला जातो. पिवळ्या रंगामुळे हे उपकरण कुठेही दिसू शकतं आणि खोदकाम सुरू असल्याची जाणीव लोकांना होते. याच कारणामुळे जेसीबीला पिवळा रंग देण्यात आला.

## ठसे टिकून राहतील

नील आमस्ट्राँगने चंद्रावर पहिलं पाऊल ठेवलं तर १९७२ मध्ये चंद्राच्या पृष्ठभागावर आपल्या पावलांचे ठसे उमटवणारा युजीन सेरनन हा अखेरचा अंतराळवीर होता. यानंतर कोणीची चंद्रावर गेलेलं नाही. या घटनेला बराच काळ उलटून गेला आहे. मात्र त्याच्या पावलांचे ठसे चंद्रावर अजूनही टिकून आहेत. अंतराळ हे एक गूढ आहे. त्यातली अनेक रहस्य अजूनही उलगडलेली नाहीत. चंद्रावरचे पावलांचे ठसे नष्ट न होण्यामागेही काही शास्त्रीय कारणं आहेत. चंद्र हा पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह आहे. चंद्राच्या उत्पत्तीची कहाणी मोठी रंजक आहे. साधारण ४५० कोटी वर्षांपूर्वी एक उल्कापिंड आदळल्याने पृथ्वीचा एक भाग तुटून वेगळा झाला आणि त्यापासून चंद्राची निर्मिती झाली असं शास्त्रज्ञांचं मत आहे. पृथ्वीवरून चंद्राचा फक्त ५९ भाग दिसतो, असं शास्त्रज्ञ सांगतात. गंमत म्हणजे अंतराळातून चंद्र गायब झाला तर पृथ्वीवरचा दिवस फक्त सहा तासांचा असेल. एरिजोना विद्यापीठातले एक शास्त्रज्ञ मार्क रॉबिन्सन यांच्या म ते चंद्र मातीचे खडक आणि धुळीच्या थराने झाकलेला आहे. या थरात मातीचे कणही असतात. याच कारणामुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उमटलेले पावलांचे ठसे वर्षानुवर्षं टिकून रहातात. पुढची अनेक वर्षं हे ठसे तसेच राहतील असं त्यांचं म्हणणं आहे.



## रेंज नसल्याने मुले अविवाहित!

आजकाल मुलांची लग्न ठरणं खूपच अवघड झालं असल्याचे तुम्ही ऐकलंच असेल. आधी लग्न करताना मुलं अटी ठेवायचे. पण 'जमाना बदल गया है' असं म्हणत आता मुलीही अनेक अटी ठेवू लागल्या आहेत. यामुळे अनेक ठिकाणी वय वाढलेली मुलं लग्नाची आस धरून बसल्याचे चित्र दिसत आहे.

अनेकदा मुली आणि त्याच्या कुटुंबीयांच्या मागण्या विचित्र असतात. देशात अशी काही गावं आहेत, जिथे मुलांची लग्न ठरत नाहीयेत. अगदी आपल्याकडे हुंडाबंदी असतानाही मुलं आणि त्यांचे कुटुंबीय मुलीकडच्यांना हुंडा देण्यासाठी तयार आहेत. पण तरीही अनेक ठिकाणी मुलांची लग्न ठरत नाहीत आणि त्यांना मोठ्या प्रमाणात नकाराला सामोरे जावे लागते. लग्न न ठरण्याचे असेच एक विचित्र कारण सध्या समोर आलं आहे. इथे हुंडा वा नोकरी नाही तर भलत्याच कारणामुळे मुलांना लग्नासाठी नकार पचवायला लागत आहे.



काय आहे प्रकरण?

मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यात मुली लग्न करून यायला तयार नसण्याचे कारण म्हणजे गावात न येणार मोबाईलचे नेटवर्क...! होय, म्हणजेच आता मोबाईल नेटवर्कचा अभाव केवळ दैनंदिन जीवनावर परिणाम करत नाही तर तरुणांच्या लग्नातही अडथळे निर्माण करत असल्याचे चित्र आता दिसून येत आहे. मोबाईलवर बोलण्यासाठी तीन किलोमीटरची पायपीट

हे गाव कुरई ब्लॉकमधील नायगाव असून ते पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये वसलेल्या वनगावांपैकी एक आहे. येथील लोकांकडे मोबाईल फोन आहेत मात्र नेटवर्कच्या कमतरतेमुळे त्यांना फोनवर बोलण्यासाठी तीन किलोमीटर दूर जावे लागते. या अनोख्या समस्येमुळेच गावातील अविवाहित तरुणांची संख्या मात्र वाढत आहे. या गावात बाहेरचे एकही कुटुंब आपली मुलगी देण्यास तयार नाही.

## झोपेचे गणितच वेगळे

प्रत्येक सजीवासाठी झोप खूप महत्त्वाची आहे. माणसाला रात्री सात ते आठ तासांची झोप मिळायला हवी. माणूस अन्नपाण्याशिवाय काही काळ जगू शकतो. पण न झोपता त्याला फार काळ रहाता येत नाही. माणसांना सात ते आठ तास झोप गरजेची असते. पण प्राण्यांचं तसं नसतं. काही प्राणी कमी वेळ झोपतात तर काही प्राण्यांचं अर्ध्यापेक्षा जास्त आयुष्य झोपेत जातं. उष्ण कटिबंधातल्या दक्षिण अमेरिकन देशांमध्ये नाईट मंकी आढळतो. ही माकडं २४ पैकी १७ तास झोपलेले असतात. जगभरात सापांच्या जवळपास २५०० प्रजाती आहे. त्या पैकी अजगर अठरा तास निद्रिस्त असतो. दक्षिण अमेरिका आणि अर्जेंटिनाच्या उत्तर भागात आढळणारा आर्मांडिलो नावाचा प्राणीही १८ तास झोपतो. ऑस्ट्रेलियात आढळणारा कोआला हा गोंडस प्राणी जवळपास २२ तास झोपतो. जिराफ खूप कमी वेळ झोपतो. एका वेळी तो पाच मिनिटं झोपतो तर दिवसभराची अर्धा तास झोप जिराफाला पुरते.

